Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development






*A Multidisciplinary International Level Referred Journal*

***March 2022 Volume-13 Issue-11***




**Chief Editor**

***Dr. R. V. Bhole***

*'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)*



**Address**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

***March-2022 Volume-13 Issue-11***

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

| EDITORIAL BOARD | | |
|---|---|---|
| ***Nguyen Kim Anh*** ***[Hanoi] Virtnam*** | ***Prof. Andrew Cherepanow*** *Detroit, Michigan [USA]* | ***Prof. S. N. Bharambe*** *Jalgaon[M.S]* |
| ***Dr. R. K. Narkhede*** ***Nanded [M.S]*** | ***Prof. B. P. Mishra,*** *Aizawal [Mizoram]* | ***Prin. L. N. Varma*** *Raipur [C. G.]* |
| ***Dr. C. V. Rajeshwari*** ***Pottikona [ AP]*** | ***Prof. R. J. Varma*** *Bhavnagar [Guj]* | ***Dr. D. D. Sharma*** *Shimla [H.P.]* |
| ***Dr. AbhinandanNagraj*** ***Benglore[Karanataka]*** | ***Dr. VenuTrivedi*** *Indore[M.P.]* | ***Dr. ChitraRamanan*** *Navi ,Mumbai[M.S]* |
| ***Dr. S. T. Bhukan*** ***Khiroda[M.S]*** | ***Prin. A. S. KolheBhalod*** *[M.S]* | ***Prof.KaveriDabholkar*** *Bilaspur [C.G]* |

**Published by**-Chief Editor, Dr. R. V. Bhole, (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

**CONTENTS**


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलीच्या शारिरीक स्वास्थ व पौष्टीक आहाराची जागरूकता<br>**डॉ. सलमा खमरोदीन शेख** | 1-2 |
| 2 | मानसिक आरोग्य आणि (covid-१९) महामारी<br>**डॉ. सलमा खमरोधीन शेख** | 3-4 |
| 3 | ब्रिटीश राजवटीतील स्त्री शिक्षण :एक अभ्यास<br>**साळुंके रंगराव बाजीराव, प्रा. शिंदे आत्माराम हानवतराव** | 5-7 |
| 4 | ॲरिस्टॉटलचे गुलामगिरीविषयक विचार<br>**प्रा. स्मिता धनिराम टेंभुर्णे** | 8-10 |
| 5 | वस्तु व सेवा कर (जीएसटी) - एक दृष्टीक्षेप<br>**प्रा.डॉ.तायपाथ व्हि.पी.** | 11-15 |
| 6 | जलव्यवस्थापणात मध्यम सिंचन प्रकल्पाचे महत्व<br>**प्रा.डॉ.डी.पी. जावळे** | 16-18 |
| 7 | स्त्रिभ्रूण हत्या: एक चिकित्सक अध्ययन<br>**डॉ. अभय श्रीहरी लाकडे** | 19-21 |
| 8 | महिला सक्षमीकरणाची सद्यस्थिती<br>**प्रा. स्वप्नाली प्रवीण बिरनाळे** | 22-25 |
| 9 | बालकांचा वाढ व विकास<br>**प्रा. डॉ. अर्चना दयाराम फेंडरकर** | 26-29 |
| 10 | ग्वाही या कविता संग्रहातील सामाजिकता<br>**साईप्रसाद मधुकर पंडीत** | 30-32 |
| 11 | कामकाजी महिलाओं की समस्याएं<br>**प्रो. त्रिवेणी विश्वजीत जाधव** | 33-37 |
| 12 | अनोळखी प्रदेश : शेतकऱ्यांच्या व्यथा आणि वेदनेची कविता<br>**प्रा.रणजित सुब्राव दांगट** | 38-44 |
| 13 | युवा संस्कृति और समाज<br>**Prof. Neha M. Dharaiya** | 45-46 |
| 14 | भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था में परिवर्तन के कारक<br>**Prof. Nisha M. Dharaiya** | 47-49 |
| 15 | कामकाजी महिलाओं की दोहरी भूमिका : एक समाजशास्त्री अध्ययन जनपद फिरोजाबाद शहर के सन्दर्भ में।<br>**Kamini Sagar, Dr. Jeevan Kumar** | 50-51 |
| 16 | गोरखपुर नगर के प्रदूषण निस्तारण का पर्यावरणीय विश्लेषण : एक भौगोलिक अध्ययन<br>**डॉ० संजय कुमार सिंह हेमन्त कुमार वर्मा** | 52-57 |
| 17 | नक्षलवाद' भारतातीय लोकशाहीसमोरील अव्हाण<br>**प्रा.डॉ. विजयकुमार सोन्नर** | 58-60 |
| 18 | भारतातील ऑनलाइन शिक्षण प्रणालीमुळे निर्माण झालेली ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणासमोरील<br>**श्री. संजय कुमार पाटील** | 61-65 |

| | | |
|---|---|---|
| 19 | महिला बचत गट : स्थापना, कार्ये आणि फायदे<br>**प्रा. निलेश सर्जेराव साळवे, डॉ. गोपीनाथ साहेबराव बोत्रे** | 66 – 69 |
| 20 | गडचिरोली जिल्ह्यातील शैक्षणिक समस्या आणि समाधान<br>**अजय व्ही.निंबाळकर** | 70-73 |

*'Journal of Research & Development'*
*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,*
*Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, March 2022, Volume-13, Issue-11*

# ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलीच्या शारिरीक स्वास्थ व पौष्टीक आहाराची जागरूकता

**डॉ. सलमा खमरोदीन शेख**
सहायक प्राध्यापिक गृहविज्ञान विभाग कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापूर

**प्रस्तावना:** भारत हा कृषी प्रधान देश आहे भारतातील बहुतांश लोकही खेड्याात राहतात प्रामुख्याने शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील वातावरण पोषक असते पण नवनवीन माहिती तंत्रज्ञानाचा पाहिजे तेवढ्याा प्रमाणात त्यांना सुविधा मिळत नाही घरातील लोकांचा दबाव या सर्व बाबीमुळे किशोरवयीन मुलीवर पाहिजे त्या प्रमाणात संस्कार होत नाही त्यामुळे त्यांचे संतुलन बिघडते व विविध समस्याला आयुष्यभर तोंड द्यावे लागते. बाल्यावस्थेपासून ते प्रौढावस्थेपर्यंतचा काळ हा किशोरावस्थेचा काळ समजला जातो लहानपण संपलेले नसते आणि मोठेपण आलेले नसते अशी अवस्था जी असते तिला किशोर अवस्था असे म्हणतात ग्रामीण भागात मुलींना दुय्याम स्थान दिले जाते तसेच मुलांकडे अधिक लक्ष हुंडा पध्दती कुटुंबात एका पेक्षा अधिक मुलींची संख्या इ. कारणामुळे मुलींच्या आहार व ओराग्याची काळजी घेतली जात नाही. त्यामुळे किशोरवयीन मुलींना कुपोषण, कमी वजन, अनेमिया मासिक पाळी विषयक समस्या आणि इतर आरोग्य विषयक समस्यांना तोंड द्यावे लागते.

**किशोरावस्थेची व्याख्या:**

१. प्रा. नलिनी चंदवासकर -

लहानपण गेलेले नसते आणि मोठेपण आलेले नसते अशा व्दिधा मनस्थितीतील अवस्थेला किशोरावस्था असे म्हणतात.

२. श्रमतेंपमसि

Adolescence is period throw which a growing person makes transition from childhood to maturity.

३. बिगे एंव हंट -

किशोरावस्था व समुचित अर्थ को प्रकट करनेवाला एक ही शब्द है परिवर्तन यह परिवर्तन शारिरीक तथा मनोवैज्ञानिक होता है. वरील सर्व व्याख्येवरून असे दिसून येते की या काळात किशोरवयीन मुलींच्या मानसिक, शारिरिक अवस्थेत या काळात इ. झपाट्याने विकास होत असतो अशा अवस्थेत प्रामुख्याने मुलीचा शारिरीक, मानसिक, भावनिक विकास होत असतो किशोर वयात मन अनुकरणप्रिय व संस्कारक्षम असते शारिरीक आणि मानसिक वाढीत बदल झाल्याने हे शारिरीक अवयवायचे बदल त्यांना नवीन वाटतात. जुनी पिढी आपल्या मुलाला किशोर पिढीवर सक्ती लादण्याचा प्रयत्न करतो आणि किशोर पिढीतील मूला मुलींना ती जुनी व बुसटलेली जुनाट वाटतात अशा व्दिधा मनस्थितीत नव्या व जुन्या पिठीत रस्सीखेच चालू असते त्यासाठी किशोरवयीन मुलींच्या शारिरीक स्वास्थावर परिणाम व बदल संशोधनातून अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. अशा वयामध्ये मुलींच्या पौष्टीक आहारावर सुक्ष्म लक्ष देणे गरजेचे असते त्याचा सुद्धा संशोधनात्मक दृष्टया अभ्यास होणे गरजेचे आहे.

**'किशोरावस्थेचा अर्थ :-**

किशोराला इंग्रजीत ॲडोलसन्स असे म्हणतात. ।कवसमेबमदबम ॲडोलसन्स हा शब्द ॲडल्स केअर या शब्दापासून तयार झालेला आहे. ॲडल्स केअर याचा अर्थ परिपक्व होणे किंवा वाढ होय. साधारणत: व्यक्तीची भावनिक, शारिरीक, सामाजिक, मानसिक अशी परिपक्वता म्हणजे किशोरावस्था होय. या अवस्थेत वय मूलींमध्ये अकरा वर्षापासून तर मूलांमध्ये बारा वर्षापासून सुरु होऊन ते अठरा वर्षापर्यंत मानले जाते.

**'किशोरवस्थेतील मुलींमध्ये शारिरीक अवस्थेतील बदलाचा क्रम -**

सर्वसाधारणपणे वयाच्या १३ ते १५ वर्ष अवस्थेतील बदलाचा क्रम लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. यानुसार मुलींची शारिरीक वाढ होते. १) संप्रेरकामधील संतुलन बदल. २) शरीराची जलद वाढ. ३) मासिक स्त्राव ४)वाढीचा प्रकोप ५) केसांची वाढ.

**किशोरवयीन मुलामुलींची मानसिक व आहारविषयक स्थिती :-**

मुलींमधील अकालपक्वता त्यांच्या विकासावर नकारात्मक परिणाम होते. त्यांच्यात लाजाळूपणा वाढतो व इतर समवयस्क मुलीपेक्षा मोठ्याा वाटत असल्यामूळे त्यांच्यात अस्वस्थता निर्माण होते. मुलींच्या अकालपक्वतेवर सामाजिक, सांस्कृतिक घटक परिणाम करतात. काही समाजात संस्कृती त्याला मान्यता मिळते तर काही समाज/संस्कृती त्याच्यावर टिका केली जाते हा बदल स्विकारला जातो की नाही हा टीकेचा विषय बनतो आणि त्याचा परिणाम त्याच्या मानसिक आणि सामाजिक विकासावर होत असतो. त्यामुळे त्यांचे मानसिक स्वास्थ बिघडते

अशात मुले बालगुन्हेगारी कडे वळण्याची शक्यता जास्त असते. या वयात मादक पदार्थाचे सेवन करण्याचे प्रमाण जास्त आढळून येते यामुळे त्यांच्या विकास होण्यास फार अडचणी निर्माण होतात. त्यामुळे चांगला नैतिक विकास, बौध्दिक, मानसिक, शैक्षणिक आणि शारिरीक विकास करता येत नाही त्यामुळे विकासाचा दृष्टीने मगे पडतात या प्रमुख बाबी टाळल्या पाहिजेत.

**किशोरावस्थेतील आहार :**

किशोरावस्थेत शारिरीक वाढ अति जलद गतीने होत असते या काळात शारिरीक व मानसिक बदल होतात. किशोरावस्था सुरू झाल्यावर २ ते ३ वर्षात पुढीलप्रमाणे शारिरीक प्रमाणे शारिरिक स्वरूप प्राप्त होते. अस्थि मजबूत होवून त्यांची लांबी वाढते. खांदे रूंद होतात. त्वचेवर चरबीचे थर जमायला लागतात. हार्मोन्स मध्ये होणा.या बदलामुळे मुलीमध्ये बदल शारिरीक बदल होतात. मुलामध्ये सुध्दा पुरूषासारखी लक्षणे दिसू लागतात. किशोरवयीन मुलांना आपण मोठे झालो असा समज असतो. त्यामुळे त्यांना स्वत:च्या आवडीचा आहार घेण्याविषयी त्यांना स्वातंत्र हवे असते. मुली वजन वाढू नये, लठठपणा येवू नये म्हणून चूकीचा आहार घेतात. त्यामुळे आरोग्यविषयक काही समस्या निर्माण होतात. या वयात हार्मोन्स तीव्र गतीने निर्माण होत असल्यामुळे काही समस्या उद्‌भवतात असे चेह-यावर मुरूम उठणे, लठठपणा, बारीकपणा, इ. आहार जसे पौष्टीक संतुलिन असेल तर त्वचा, केस, डोळे निरोगी आणि चमकदार राहू शकतात. किशोरवयात मुलामुलींचे लक्ष वेधणे आवश्यक असते या वयात भुक तीव्र असते पोषणासंबंधी गरज वाढलेली असते. भावनिक परिवर्तन येतात. जसे मातापित्याच्या बंधनातून स्वतंत्र होण्याची इच्छा असते या वयात मसालेदार, तिखट, चमचमीत पदार्थ खाण्याचा कल जास्त असतो. अन्न घेण्याच्या सवयी ह्याा निश्चित झालेल्या असतात चुकीच्या सवयी लागल्या असल्यास त्यात बदल करणे गरजेचे असते मुलींच्या अवयवाचा विकास या काळात होत असतो म्हणून योग्य प्रकारे होण्यासाठी पौष्टिक आहार घेणे महत्त्वाचे असते. ग्रामीण मुलींमध्ये प्रामुख्याने आहाराचा आभाव असतो. मुलींना ९० टक्के मिळणारा आहार हा पौष्टीक नसतो, त्यासाठी त्यांना पौष्टीक आहार मिळणे आवश्यक आहे. त्याशिवाय जीवनातील आरोग्य विषयक धोके शरीराची योग्य वाढ सुदृढ शरीरासाठी आणि मानसिक व बौद्धिक वाढ ही प्रामुख्याने आहारावर अवलंबून आहे. त्यासाठी अन्नधान्ये, ज्वारी, बाजरी, गहू, डाळी, पालेभाज्या, साखर, गुळ, तेल, तूप, दुध, फळे, फळांचे रस असा समतोल आहार घ्यावा.

किशोर वयीन मुलामुलींना आहारात घ्यावयाची काळजी मादक पदार्थ टाळले पाहिजे. शाळेतील महाविद्यालयातील विद्यार्थी सिगारेट ओढणे, दारूपिणे, इ. वाईट सवयीच्या आहारी गेल्याचे आढळून येते. साधारणता तरूणामध्ये २६.६ टक्के किशोर हे वाईट सवयीच्या आहारी जातात मोठ्याा शहरात मोठ्या प्रमाणात अशा किशोरांची संख्या जास्त आढळून येते. आई वडीलांना आपला मुलगा वाईट सवयीच्या गुलाम झाला आहे हे माहित असते.

**निष्कर्ष :-**

यावरून असे लक्षात येते की ग्रामीण भागातील मुलामुलींमध्ये माहिती व प्रसार माध्यमे आणि नवीन तंत्रज्ञानाचा अभाव जाणवतो आणि समाजात व कुटुंबातील लोकांच्या दबावामुळे मुले मुलीं त्यांच्या वाढत्या शारिरीक, मानसिक भावना दडपून ठेवतात व ब.याच मुली तणावत राहतात शिवाय कुटुंबात दैनंदिन जीवनाच्या आहारात येणा.या अन्नाचे सेवन दडपणाखाली करावे लागते. त्यावरून त्यांच्या इच्छा अपूर्ण राहतात परंतु त्यांच्या शरिरिक वाढी संदर्भात व पौष्टिक आहार या विषयी किशोरवयीन मुलींना योग्य मार्गदर्शन केले तर निश्चितच योग्य संस्कार होवून मुलींना योग्य वळण लागून जीवनातील विविध धोके टाळून मुलींचे सुदृढ आरोग्य बनविता येते हे लक्षात येते.

**संदर्भ सुची :**

१) सौ.चदंवासकर नलिनी, किशोरावस्था महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती प्रकाशन समिती,नागपूर.

२) डॉ. जाधव.के.एस. वैलासिक मानसशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे

३) डॉ. वृन्दा सिंह, आहारनियोजन श्याम प्रकाशन, जयपूर, २००३

४) डॉ. नलिनी वराडपांडे, बालविकास पिपळांपूर ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

५) प्रा. शोभा वाघमारे, पोषण आणि आहार शशिकांत पिपंळापूरे विद्या बुकस पब्लिशर्स औरगांबाद

# मानसिक आरोग्य आणि (covid-१९) महामारी

**डॉ. सलमा खमरोधीन शेख**
सहय्यक प्राध्यापिका गृहविज्ञान विभाग कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापुर जि.जालना

**सारांश** चीनच्या वुहान शहरात गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम कोरोना व्हायरस संसर्गामुळे उदभवलेल्या व्हायरसच्या उद्रेकाचे परिणाम, सामाजिक, आर्थिक संकट आणि गंभीर मानसिक त्रासाची परिस्थिती जगभरात वेगाने पसरले कोविड -१९ च्या प्रार्दुभावा दरम्यान तणाव, चिंता, निराशा या शिवाय मासिक आरोग्याच्या दृष्टीन विविध मानसिक समस्या आणि महत्वाचे परिणाम हळूहळू उदयास आले

**प्रस्तावना :-**

Covid- 19 साथीच्या रोगाने जगभरातील लोकसंख्येवर शारिरीक, आरोग्यावर आणि सुचनेनुसार परिणाम झाला आहे, परंतु असे दिसून येते की साथीच्या रोगामुळे अनेक देशांना मानसिक आरोग्य आणि बाणीचा सामना करावा लागेल जो अनेक वर्षा पर्यंत त्याच्या परिणाम राहील युके सरकारने सुरू केलेल्या ब्रिटीश अकादमीने केलेल्या स्वतंत्र पुनरोवलोकनात महामारीच्या दीर्घकाळ टिकणा-या सामाजिक प्रस्तावना कोविड दणक असे संबोधले आहेकोविड-१९ च्या प्रार्दुभाव दरम्यान तणाव, चिंता निराशा यासारख्या अनेक मानसिक समस्या उदयास आल्या,ज्या व्यक्तींना संसर्ग होण्याच्या जोखमीचा सामना करावा लागतो त्यांच्याआरोग्याबद्दल व्यापक भिती इतरांना संसर्ग हाण्याची चिंता आणि कुटुंबातीलसदस्याला संसर्ग हाण्याची भिती निमाण होऊ शकते कोविड-१९ साथीच्या रोगाला प्रतिसाद म्हणून भिती, चिंता, रात्री झोपेचा त्रास इत्यादी ची साहित्यात नोंद केल्याचे आढळून आले काही ताण तणावामध्ये घट झाली असून ही लोकांनी अनेक लॉकडाऊन सह अनेक समायोजने आणि आर्थिक मंदीचे परिणाम सहन केले आहेत एकटेपणा, शोक, विषाणू, बेरोजगारी इत्यादी घटकांचा मानसिक आरोग्यावर परिणाम होता. हे ताणतणाव असुनही बवअपक. १९ च्या व्यापक प्रभावाचा लोकांवर तितकाच परिणाम झाला नाही काही व्यक्तीसाठी मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम अल्पकालीन किंवा सौम्य असेल तर इतरांसाठी मानसिक आरोग्यामध्ये अधिक गंभीर झाला असे इन्स्टियुट ऑफ फिस्कल स्टडीच्या म्हणण्यानुसार असलेल्या पुराव्यानुसार असे दिसुन येते की साथीच्या रागाचा मानसिक आजाराच्या लक्षणामध्ये फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे त्याचप्रमाणे महामारिच्या अभ्यासातील मानसिक आरोग्याच्या परिणामावरुन असे दिसुन आले की एका वर्षानंतर साथीच्या रागामुळे प्रौढांवर व्यापक आणि खोल भावनिक प्रभाव पडला आहे मेटंल हेल्थ फाऊडशनने आयोजित केलेल्या मानसिक आरोग्यावरील विषाणूच्या परिणामावरील ,क अभ्यासावरुन असे निदर्शनास येते की

महामारीच्या तणावामुळे चिंता निर्माण हाण्याचे प्रमाण मार्च २०२० मधील ६२ः वरुन फेब्रुवारी २०२१ मध्ये पर्यंत कमी झालीमे २०२१ मध्ये राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालयाने असे अहवाल दिले की अलीकडे ब्रिटीश मध्ये नैराश्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. मेटल हेल्थ फाऊडेशने युकेमध्ये वाढत्या मानसिक आरोग्य संकटाचा इशारा दिला आहे मे २०२१ पासुन मोठ्या प्रमाणावर कोविड-१९ सामाजिक अभ्यासानुसार असे निष्कर्ष निदर्शनास आले की तरुण ,कटेपणा नैराश्य, चिंता सर्वाधिक आढळुन आली- मेटंल हेल्थ फाऊंडशनच्या अभ्यासात असे दिसुन आले आत्महत्येसंबधी विचार किंवा भावना २०२० ,प्रिल मध्ये ८ः वरुन फेब्रुवारी २०२१ मध्ये १३ : पर्यंत वाढल्या होत्या हे स्पष्ट आहे की महामारी आणि त्यावर उपाय म्हणून केलेल्या विविध उपाययोजनामुळे मानसिक आरोग्यावर वेगळे परिणाम आढळुन आले लोकांचे अनेक गट प्रभावित झाले हे झालेल्या सशोधनाच्या निषर्कर्षातुन आढळुन आल. पुर्वी अस्तित्वात असलेल्या मानसिक आरोग्य स्थिती असलेल्या

व्यक्तीवर जास्त परिणाम होतो ज्यांना नोकरीवरुन काढुन टाकले किंवा त्यांचे उत्पन्न कमी झाले त्यांची मानसिक स्थिती खालावली असे निदर्शनास आले जरी नोकरी टिकवुन ठेवण्याच्या योजनांनी काही कामगाराचे उत्पन्न यांच्यातील जटील दुर करण्याचे धोरण निर्मात्याद्वारे दोन्ही समस्याकडे सयुंक्त दृष्टीकोन आवश्यक आहे- पुरुषांपक्षा स्त्रियांना जास्त त्रास झाल्याचे आढळुन आले स्त्रियांना घरकाम मुलांची काळजी, घरगुती शिक्षण मोठया प्रमाणात समायोजन केल. तरीसुध्दा जागतीक आरोग्य संघटनेने असे सुचीत केले की साथीच्या रागाने जगभरातील ९५ दशामध्ये गंभीर मानसिक आरोग्य सेवा विस्कळीत झाल्यासाथीच्या रोगाने जलद बदल आणि सेवा वितरित करण्याचे मार्ग देखील सुचवण्यात आले निष्कर्ष पुराव्यावरून असे सुचित केले जाते की साथीच्या रोगाचा परीणाम म्हणून लोकसंख्येच्या मानसिक आरोग्यावर लक्षणीय परिणाम झाला आहे. सेवावरील मागणी वाढत आहे शिवाय अनेक आव्हाने शिल्लक आहेत बरंच तज्ञानी चेतावनी दिली की अणखी बरेच काही करण्याची आवश्यकता आहे. धोरण आणि निर्णय घणा-यांनी साथीच्या रागाच्या उपयोग संकटापासून बचाव करण्याच्या दष्टीनेच नव्हे तर व्यापक आरोग्य असमानता दूर करण्याच्या संदर्भात सघर्ष करण्या-या मानसिक आरोग्य प्रणाली मध्ये क्रांती घडण्याची संधी म्हणुन वापरण्याचे आव्हान ही केले आहे.

**संदर्भ सुची**

१) ठाकुर व्ही. जैन .ए-कोविड-१९ आत्महत्या जागतिक शास्त्रीय महामारी.

२) खान एस सिद्दीक एम ए बशीर कोरोना व्हायरसचा उद्रेक आणि त्याचा
जागतिक मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम.

३) वांग जे कोविड १९ व्यक्तीवर हाणारा मानसिक प्रभाव

४) इंडिया टुडे (२०२०) कॅम्पस वर कोविड-१९ चा प्रभाव

५) https%//covid19-int

६) https%//acedemic-com journals

# ब्रिटीश राजवटीतील स्त्री शिक्षण :एक अभ्यास

**साळुंके रंगराव बाजीराव[1] प्रा. शिंदे आत्माराम हानवतराव[2]**
[1]छ.शिवाजी मा.व उच्च माध्यमिक विद्यालय दांडेगाव
[2]ज्ञानोपासक कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्याल, परभणी

प्रस्तावना: जगाच्या इतिहासात १२१५ साली इंग्लंडमध्ये मॅग्ना कार्टा कायद्याची सनद पारित झाली आणि युरोपात एका नव्या युगाला सुरुवात झाली.युरोपियन लोकांना या सनदेणे आपले मूलभूत हक्क प्रदान केले.या कायद्याला स्वातंत्राची महान सनद असे लोक संबोधू लागले.तसेच नागरिकांच्या अधिकारात वाढ झाली.लोक पारंपारिक विचारातून मुक्त होऊन वैज्ञानिक विचाराकडे वळू लागले.यातून युरोपात शैक्षणिक क्रांतीला सुरुवात झाली.या वैज्ञानिक विचारातून युरोपात मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्रांती उदयास आली या औद्योगिक क्रांती मुळे युरोपियनाना मोठ्या प्रमाणात कचामाल व जागतिक बाजारपेठांची आवशकता भासू लागली.युरोपीन कच्चा माल मिलवण्यासाठी व पक्का माल विकण्यासाठी जगभर भ्रमंती करू लागले.पुढे सोळाशे च्या सुमारास ब्रिटिश भारतात व्यापारी म्हणून आले आणि सत्ताधीश बनले या सत्तेला टिकवण्यासाठी आणि अधिकाधिक व्यापार वाढवण्यासाठी त्यांना सुशिक्षित व कुशल कामगारांची आवश्यकता भासू लागली ही गरज भागवण्यासाठी ब्रिटिशांनी भारतीयांना इंग्रजी व पाश्चात्य शिक्षण देण्यासाठी काही महत्त्वाच्या सुधारणा केले आहेत त्या खालील प्रमाणे पाहता येतात.

**उद्दिष्ट्ये** :

१) ब्रिटिश कालीन स्त्री जीवनाचा अभ्यास..
२) ब्रिटिश पूर्व कालीन स्त्री शिक्षणाची परीस्थिती चा अभ्यास.
३) ब्रिटिशांचा शिक्षणविषयक धोरणांचा अभ्यास

**१) ब्रिटिश पूर्व काळातील स्त्री शिक्षण:**

ब्रिटिश पूर्व काळात शिक्षण हे सरकारची जबाबदारी नाही अशी राज्यकर्तांची समज होती.तर शिक्षण हे सार्वत्रिक नव्हते ते उच्चवर्णीय आणि श्रीमंता पुरतेच मर्यादित होते.तर समाजात स्त्री शिक्षणाला महत्व दिले जात नव्हते.शूद्र अतिशूद्र स्त्रिया महार मांग या जातीतील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता.शिक्षण हे पारंपारिक व धार्मिक स्वरूपाचे होते.वेद,धर्मशाळा,व्याकरण,तर्कशास्त्र,वैदिकशास्त्र, ज्योतिषशास्त्र इत्यादी विषयाचे शिक्षण दिले जायचे.मानवी मूल्य विज्ञाणनिष्ठता या गोष्टींचा शिक्षणात अभाव होता. पंडित व शास्त्रीच्या खेडोपाडी खाजगी शाळा होत्या त्यातही सर्वांना शिक्षणाचा अधिकार नव्हता.समाजातील स्त्रियांना जिवन चूल आणि मूल या पुरत्याच मर्यादित होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. समाजात ब्राह्मण वर्गाचा पगडा होता पुढे पेशवे काळात तर स्त्रियांवर अनेक बंधने लादली गेली काही उच्चवर्णीय स्त्रिया सोडल्या तर सामान्य स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता.एकंदर भारतीय समाजातील स्त्री शिक्षणाची परिस्थिती पाहता क्वचितच स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार मिळत असे.

**2) ब्रिटिशांचे शिक्षणाविषयी चे धोरण:**

ब्रिटिश भारतात व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले राज्य करत असताना त्यांना आपले साम्राज्य चालवण्यासाठी काही कुशल कारागिरांची सुशिक्षित कामगारांची आवश्यकता वाटू लागली त्यामुळे त्यांनी भारतीयांना शिक्षण देण्यासाठी काही योजना राबवण्याचे पाहायला मिळते.१८१३ च्या सनदी कायद्यानुसार भारतीय लोकांच्या शिक्षणासाठी ब्रिटीश सरकार एक लाख रुपये खर्च करील असे ठरले. सुरूवातीला ब्रिटीशांचा भारतीयांना शिक्षण देण्याचा उद्देश हा उदात्त स्वरूपाचा नव्हता.त्याचे कारण की कंपनीच्या राज्यकारभार हा इंग्रजी भाषेत चालत असे त्यामुळे कामगारांना इंग्रजी भाषा येणे आवश्यक होती तर इंग्रजी शिकलेले लोक ब्रिटिशांचे समर्थक बनवू शकतात व ब्रिटिशांचा इंग्लंड मधून येणारा माल भारतात विकण्यासाठी मदत होऊ शकेल असे ब्रिटिशांना वाटत होते.ब्रिटिशांचा भारतीय शिक्षणाबद्दल दृष्टिकोण हा जरी स्वार्थी स्वरूपाचा असला तरी ब्रिटिशांनी भारतात पुढे केलेल्या शिक्षण सुधारणा महत्त्वाच्या आहेत व्हाईसरॉय लॉर्ड हेस्टींग,लॉर्ड विल्यम बेटिंग,लॉर्ड डलहौसी यांचे

भारतीयांना शिक्षण देण्याचे धोरण व त्यासाठी त्यांनी केलेल्या विविध सुधारणा महत्त्वाच्या आहेत.त्यात मेकाले च्या सुधारणा वूडचा खलिफा,हंटर कमिशन आणि लॉर्ड रिपन चे उदारमतवादी धोरण या सर्व घटना भारतातील स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या आहेत.

**३) एल्फिस्टनचे शैक्षणिक कार्य:**

१८१९ मध्ये लॉर्ड एल्फिस्टनची मुंबई प्रांताचे गव्हर्नर म्हणून नेमणूक करण्यात आली एल्फिस्टन यांनी यापूर्वी वीस वर्षे महाराष्ट्रातील शिंदे,गायकवाड,भोसले,पेशवे,इत्यादी मराठा सरदारांच्या दरबारी वकील म्हणून काम केले होते.या काळात त्यांना मुंबई प्रांतातील समाजाचा जवळचा संबंध आला होता. एल्फिस्टन हे उदारमतवादी विचाराचे होते.त्यांनी मुंबई प्रांतातील लोकांच्या शिक्षणासाठी महत्त्वाचे कार्य केले आहे.एलफिस्टन यांनी १८२३ मध्ये भारतीयांच्या शिक्षणासाठी एक योजना आखली होती.त्यात त्यांनी १८२४ मध्ये मुंबई इंजिनिअरिंग कॉलेजची स्थापना केली तर १८२६ मध्ये बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.मुंबई प्रांतात कंपनीतर्फे शाळा सुरु करणे हा सोसायटी चा मुख्य हेतू होता.१८२४ मध्ये एलफिस्टन कॉलेज ची स्थापना करण्यात आली पुढे १८३४ मध्ये त्याचे रूपांतर एल्फिस्टन महाविद्यालयात करण्यात आले होते. एल्फिस्टन यांनी उच्च शिक्षणाला महत्त्व दिले होते.त्यांनी१८२१ मध्ये उच्च शिक्षणासाठी पूना कॉलेज ची स्थापना केली १८६१मध्ये त्याचे नामकरण डेक्कन महाविद्यालय असे करण्यात आले.याच डेक्कन महाविद्यालयात आगरकर ,टिळक, अनेक समाजसुधारकांनी शिक्षण घेतले आहे. एल्फिस्टन यांच्या पुढाकाराने १८२६ मध्ये मुंबई येथे वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.एलफिस्टन यांचा मुलांण प्रमाणे मुलीनेही शिक्षण घ्यावे असा आग्रह होता.शाळान मध्ये मुलींची संख्या वाढावी यासाठी प्रयत्नशील होते. एल्फिस्टन यांनी मुंबई प्रांतात शैक्षणिक सुधारणा करण्याचे काम केले त्यातून समाजात शिक्षणाबद्दलचे वातावरण निर्माण झाले याचाच परिणाम पुढे महात्मा फुले यांनी भारतीय शिक्षणात स्त्रियांना समावून घेण्यासाठी १८४८ मध्ये मुलींची पहिली शाळा पुणे येथे स्थापन केली.

**4 हंटर कमिशन:**

भारतीय शिक्षणाच्या विकासाच्या दृष्टीने काही सुधारणा करता येणे शक्य आहे का ? याचा विचार करण्यासाठी भारतात व्हाईसराय लॉर्ड रिपन यांनी सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली 3 फेब्रुवारी१८८२ मध्ये हंटर कमिशनची स्थापना केली.या कमिशनने भारतीय शिक्षणातील त्रुटी दूर करण्यासाठी भारतभर दौरे करून अनेकांच्या साक्षी नोंदविल्या.या कमिशनला महात्मा फुले यांनी दिलेली साक्ष महत्त्वाची असून त्यांनी आपली साक्ष देत असताना भारतीय समाजातील स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न उपस्थित केला भारतातील स्त्रियांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे अशी त्यांनी हंटर कमिशन पुढे मागणी केली होती.ही मागणी हंटर कमिशन ने मान्य करून भारतात पहिल्यांदा स्त्री शिक्षणा साठी सुधारणा करण्याचे काम केले हंटर कमिशनने स्त्री शिक्षणासाठी खालील सुधारणा सुचवल्या होत्या.१)प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे भारतातील स्त्रियांच्या शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे.२)स्त्री शिक्षण च्या प्रसारासाठी सरकारने मुलींच्या खाजगी शाळांना आर्थिक अनुदान द्यावे.३)ज्या ठिकाणी स्त्री शिक्षणासाठी समाज कमी पडेल त्या ठिकाणी स्त्री शिक्षणाची जबाबदारी सरकारने घ्यावी.४)स्त्री शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित अशा स्त्री शिक्षकांची नेमणूक करावी या शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे अशा विविध क्रांतिकारी सुधारणा शिफारस हंटर कमिशनने ब्रिटिश सरकारला केल्या तर या सर्शिफारशी ची अमालबजावणी करण्याचे काम व्हाईस राय लॉर्ड रिपन यांनी केली.

**५) हरटॉग कमिशन १९२९:**

भारतात१९२७ च्या सुमारास सायमन कमिशन आले.भारतातील प्रशासकीय सुधारणा सुचवण्यासाठी या कमिशनची नेमणूक करण्यात आली होती.भारतीय शिक्षण व्यवस्था कशी आहे याची पाहणी करून अहवाल देण्याचे काम सायमन कमिशनला दिले होते.त्यासाठी सायमन कमिशन ने सर फिलिप्स हरटॉग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली या समितीने स्त्री शिक्षणासंबंधी अभ्यास करून १८२९ मध्ये स्त्री शिक्षण सुधारणा संबंधी आपला अहवाल सायमन कमिशनला दिला त्यात खालील महत्त्वाच्या सूचना करण्यात आल्या होत्या.१)मुलगा आणि मुलगी या दोघांच्याही शिक्षणावर खर्च करावा मुला प्रमाणे मुलींनाही शिक्षण देणे महत्त्वाचे आह.२)स्त्री शिक्षणाची योजना आखण्यासाठी शिक्षित स्त्रियांकडे जबाबदारी द्यावी.३)स्त्रियांना स्थानिक मंडळे व शैक्षणिक संस्था यांच्यात प्रतिनिधित्व द्यावे.४)स्त्रियांना औद्योगिक व व्यावसायिक शिक्षण द्यावे.५)स्त्री शिक्षणासाठी प्रशिक्षित शिक्षिका नेमावेत.६)ग्रामीण भागातील स्त्री यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे.७)स्त्रियांच्या आरोग्य शिक्षणाची व्यवस्था करावी.८)स्त्रियांसाठी ग्रह विज्ञान संगीत विषयक शिक्षणास सुरुवात करावी अशा अनेक महत्त्वाच्या शिफारशी हां हम कमिशनने सरकारकडे

करून स्त्रियांच्या शिक्षणाकडे सरकारचे लक्ष वेधण्याचे काम केले होते

**निष्कर्ष :**

१) ब्रिटिशांनी भारतात स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले आहे.

२) ब्रिटिशांचा स्त्री शिक्षण विषयक सुधारणा महत्त्वाच्या ठरले आहेत.

३) ब्रिटिशांनी भारतीय स्त्रियांना वैज्ञानिक व पाश्चात्त्य शिक्षण देण्याची सुरुवात केलेली दिसून येते.

४) ब्रिटिशांनी स्त्रियांच्या उच्च शिक्षणा मिळावे यासाठी प्रयत्न केले दिसून येते.

५) ब्रिटिशांनी भारतात शिक्षणाचा प्रसार व प्रसार करण्यासाठी अनेक संस्था महाविद्यालये स्थापन केली आहेत.

**संदर्भ सूची**

**१)** कीर धनंजय,महात्मा जोतीराव फुले,पाप्युलर प्रकाशन,मुंबई.

२) कीर धनंजय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पाप्युलर प्रकाशन,मुंबई.

३) साने.सी.एस,स्त्री जीवन,मौज प्रकाशन,मुंबई.

४) डॉ.पाटील लीला,भारतीय स्त्री जीवन,मेहता पब्लिकेशर्स हाऊस,पुणे.

५) गोपुजकर प्रतिभा,कर्तृत्वशालिन,१व २ श्री विद्या प्रकाशन पुणे.

६) डॉ.अनिल कठारे,भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास,एज्युकेशनल पब्लिकेशर्स,औरंगाबाद.

# ॲरिस्टॉटलचे गुलामगिरीविषयक विचार

**प्रा. स्मिता धनिराम टेंभुर्णे**
विभाग — राज्यशास्त्र विभाग प्रमुख स्व. निर्धनराव पाटील वाघाये कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सानगडी जि. भंडारा
smitatembhurne39@gmail.com

**प्रस्तावना :—** आजपर्यत अनेक ग्रीक विचारवंत होऊन गेले, पण त्या सर्वामध्ये ज्या विचारवंताने राज्यशास्त्राला शास्त्रीय स्वरूप देण्याचे काम केले तो विचारवंत म्हणजेच ॲरिस्टॉटल होय.
सॉक्रेटीस व प्लेटो या ग्रीक विचारवंतानंतर आपल्या राजकिय विचारांनी राज्यशास्त्राला प्रभावित करण्याचे कार्य ॲरिस्टॉटलने केले. अनेक विचारवंतानी राज्यशास्त्राचा अभ्यास पारंपारिक पध्दतीने केला पण ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राचा अभ्यास शास्त्रसुध्द पध्दतीने केला व सर्व शास्त्रात राज्यशास्त्राला श्रेष्ठ स्थान मिळवून दिले. प्लेटो ने राजकिय तत्वज्ञानाचा प्रारंभ केला होता तर राज्यशास्त्राचा अभ्यास करतांना तुलना व निरिक्षण पद्धतीचा अवलंब ॲरिस्टॉटलने केला. ॲरिस्टॉटल हा प्लेटोचा शिष्य होता. परंतु प्लेटोचे विचार जसेच्या तसे न स्विकारता आवश्यक तेथे टिका करून स्वतंत्रपणे आपले विचार ॲरिस्टॉटलने प्रतिपादीत केले. १५८ नगरराज्याच्या घटनांचा तूलनात्मक अभ्यास केला. म्हणुनच ॲरिस्टॉटलला राज्यशास्त्राचे जनक मानले जाते. 'अलेक्झांडर द ग्रेट' याचा गुरू ॲरिस्टॉटल आहे.

## शोध निबंधाचा उद्देश

तत्कालीन ग्रीक नगरराज्यात गुलामगिरी पद्धती अस्तित्वात होती. ती पद्धत कशी चांगली आहे आणि गुलाम व मालक ह्या दोघांसाठी कशी आवश्यक आहे हे ॲरिस्टॉटलने आपल्या विचारातून सांगितले आहे. गुलामगिरी विषयक विचार स्पष्ट करणे हे या शोध निबंधाचा उद्देश आहे.

## ॲरिस्टॉटलचा जीवन परिचय

ग्रीक नगरराज्यातील अथेन्स मधील 'स्टॅगिरा' नावाच्या गावी ॲरिस्टॉटलचा जंन्म इ. स. पूर्व ३८४ मध्ये झाला. त्याचे वडिल निर्कोमास मॅसिडोनियाच्या राजदरबारात राजवैद्य होते. त्यामूळे त्याचे बालपण राजकारणी लोकांच्या सहवासात गेले. साहाजीकच राज्यकारभाराविषयीचे बाळकडू त्याला बालपणातच अप्रत्यक्षपणे मिळाले त्यामूळे राजनितीची बरीच माहिती ॲरिस्टॉटल ला आपोआप प्राप्त झाली. अथेन्समध्ये प्लेटोच्या ॲकेडमीत वयाच्या १७ व्या वर्षी शिक्षणासाठी प्रवेश घेऊन वयाच्या ३७ वर्षापर्यत तो प्लेटोजवळ होता. या वीस वर्षाच्या काळातच ॲरिस्टॉटलचा तत्वज्ञानाचा पाया घातला गेला.
ॲरिस्टॉटलचे विवेचन मुद्देसुद आणि विश्लेषण पद्धतशिर होते, म्हणून 'जाणकारांचा गुरूवर्य' या शब्दात त्याचा गौरव केला जातो. दि पॉलिटिक्स, द कॅन्स्टीट्युशन ( The Constitution ) या महत्वाच्या ग्रंथासोबत ४०० ग्रंथाचे लिखान ॲरिस्टॉटल ने केल्याचे मत काही लेखकांनी म्हटले आहे. यात ऑन किंगशिप' आणि कन्सर्निग कॉलनीज या दोन ग्रंथाची रचना सिकंदरसाठी ॲरिस्टाटलने केली. अनेक ग्रंथ काळाच्या उदरात गडप झाले. त्यांच्या ग्रंथसंपदेतील राज्यशास्त्रीय दृष्टीने सर्वात महत्वाचा ग्रंथ म्हणजे 'पॉलिटीक्स' होय. 'राजकारणी लोकांची मार्गदर्शिका आपण द्यावी हा पॉलिटीक्स ग्रंथ लिहण्यामागे त्याचा हेतू होता. अनेक विषयावर आपले विचार मांडले असून त्यापैकी गुलामगिरीविषयक विचार हा महत्वाचा विचार होय. गुलामगिरी पद्धत मानवतेच्या दृष्टीकोनातून कितीही वाईट असली तरी तत्कालीन ग्रीक नगरराज्यात जी गुलामगिरी पद्ध्त होती ती त्याला मान्य होती. आणि त्याबद्दलचे त्याने आपले विचार मांडले आहेत. ते पुढीलप्रामाणे.

## गुलामगिरी विषयक विचार

ॲरिस्टॉटलला सनातनी विचारवंत म्हटले जाते. त्याच्या अनेक कारणापैकी एक कारण आहे त्याचे गूलामगिरीबाबत असलेले विचार इ.स. पूर्व काळातील ग्रीक नगरराज्यामध्ये गुलामगिरीची प्रथा होती. ग्रीक

समाजव्यवस्थेचा आणि अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार दासप्रथा हाच होता. दासप्रथे शिवास ग्रीक नगरराज्याची कल्पनाच करता येत नव्हती. गुलामाचे शोषण जमीनदार वर्ग करीत होता. गुलामात श्रमीक, गरीब, युद्धबंदी व विकत घेतलेल्या माणसाचा समावेश होता, राष्ट्राच्या संपत्तीत गुलामांचा समावेश होता. त्याच्या श्रमावर समाजाची उपजिविका चालत होती. अशा प्रकारच्या गुलामगिरीच्या समर्थनार्थ ॲरिस्टॉटलने विचार मांडलेले आहेत. इंतराप्रमाणे त्यानेसुद्धा आपल्याजवळ गुलाम बाळगले होते. त्या काळात ग्रीक लोक गुलामाच्या मदतीनेच जिवनावश्यक गरजा पूर्ण करित होते. दासप्रथेविषयी काही बुद्धीजीवी लोक शंका व्यक्त करू लागले होते. दूसरीकडे सोफिष्ट विचारवंत अमानुष असणारी दासप्रथा समुळ नष्ट व्हावी ह्या विचाराचे होते. अशा परिस्थितीत वास्तव्यवादी विचारवंत ॲरिस्टॉटलने दासप्रथेचे समर्थन करणारे विचार मांडले.

## ॲरिस्टॉटलच्य मतानुसार गुलामाचा अर्थ व गुलामगिरीचे स्वरूप

‘‘निसर्गत: किंवा स्वभावत: जो आपला नसून दूसऱ्याचा आहे तो दास किंवा गुलाम होय.’’ असे ॲरिस्टॉटल गुलामगिरीविषयक आपले विचार मांडतांना गुलाम या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करतो. गुलाम आणि मालक कुटुंबरचनेतील दोन महत्वाचे भाग आहेत. त्याच्या मते एक कुटुंब म्हणजे पती—पत्नी, आई—वडील, मूले—मूली आणि गुलाम. गुलामाशिवाय कुटुंबाची कल्पनाच करता येत नाही. उपजीविकेचे साधन म्हणून शेतीमधील व एखाद्या गृहउद्योगातील कष्टाची साधने आणि कुटूंबातील कष्टाची कामे करण्यास गुलाम उपलब्ध असतील तरच कुटुंबांतील पुरूषाला रिकामा व फुरसतीचा वेळ मिळून राज्याच्या दैनंदिन कार्यात सहभागी होऊ शकतो, सुसंस्कृत जीवन गुलामगिरीशिवाय होणे शक्य नाही. म्हणून त्या काळात प्रत्येक ग्रीक कुटूंबात एकापेक्षा अधिक गुलाम बाळगले जात असत. कुटूंबाच्या मालकीच्या दोन वस्तु असतात — सजीव व निर्जीव.

निर्जीव वस्तूमध्ये शेती, घर, पैसा, यांचा समावेश होता. तर घोडे, पशु व गुलाम यांचा सजीव वस्तूमध्ये समावेश होतो. गुलाम म्हणजे मालकांचे संपुर्ण अधिकार गुलामांवर असून गुलाम आपल्या मताप्रमाणे वागू शकत नाही. त्याला स्वत:ची ईच्छा नसते. सजीव व निर्जीव वस्तुंच्या आधारावर ॲरिस्टॉटल संपत्तीचे दोन प्रकारात वर्गीकरण करतो.

**१) सजीव संपत्ती**

**२) निर्जीव संपत्ती**

सजीव संपत्तीत गुलाम, पशु व घोडे यांचा समावेश होतो. तर निर्जीव संपत्तीत शेती, घर भौतिक वस्तु इ. चा समावेश होतो. मनुष्याला चांगले व सुखी जीवन जगता यावे म्हणून गुलाम आवश्यक आहेत. या आधारे ॲरिस्टॉटल गुलामगिरीचे समर्थन अनेक प्रकारे करतो. नागरिकांना चांगले जीवन जगता यावे राज्यकारभारासाठी पूर्ण वेळ देता यावे, एखादे बुध्दीकौशल्ये तसेच आर्थिक गरज भागविण्याची चिंता त्यांच्या मागे असु नये यासाठी गुलामाची गरज असल्याचे मत आपल्या विचारात सांगतो. कुटुंब व संपत्तीमागे गुलामगिरीची प्रथा सुध्दा नैसर्गिक आहे. माणूस जशी संपत्ती बाळगतो तसेच गुलाम सुध्दा बाळगायला पाहिजे असे त्याचे म्हणने आहे. गुलाम आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनाचा एक महत्वपूर्ण घटक ठरतो.

## गुलामगिरी पद्धतीची आधारभूत तत्वे

ॲरिस्टॉटलने आपले गुलामगिरीविषयक विचार मांडतांना दोन आधारभूत तत्वे सांगितले आहेत.

### १) नैसर्गिक असमानता

ॲरिस्टॉटलच्या मते ‘मनुष्य हा निसर्गत: जन्माने वेगळा असतो. प्रत्येक मनुष्यामध्ये वेगवेगळे गुण असून काही मनुष्य जन्मत: बुध्दीमान असतात तर काही मुळातच बुध्दीमान नसतात गुलामांची बुध्दी अविकसीत असते त्यामुळे गुलाम स्वत:च्या विकासासाठी काहीच करू शकत नाही. मालक मुळातच बुध्दीमान असतो त्यामूळे अविकसीत असलेला गुलाम मालकांच्या अधिन राहूनच चांगले जीवन जगू शकतो. म्हणजेच मालक व गुलाम ह्या दोघांमध्ये निसर्गत: फरक असल्यामूळे बुध्दीमान मालकाला बुध्दीहीन गुलामावर शासन करण्याचा स्वाभाविक अधिकार आहे, म्हणून बौध्दीक व शारीरिक समतेच्या आधारावर फरक स्पष्ट करता येऊ शकतो असे ॲरिस्टाटल म्हणतो.

## २) जन्मता: अंतर असते

ॲरिस्टॉटलच्या मते काही लोक जन्मत: शासन करण्यास योग्य असुन मालक होण्यासाठीच जन्माला आलेली असतात. आणि काही लोक शासीत होण्यासाठी जन्मलेले असून गुलाम होण्यासाठी जन्माला येतात. मालक आणि गुलाम यांच्या शरिरचने मध्ये निसर्गातच फरक केला आहे.

अशाप्रकारे या दोन मुलभूत तत्वाच्या आधारावर गुलामगिरीचे समर्थन केले आहे. स्वाभाविकच बुध्दीमान व्यक्ती बुध्दीहीनांना आपले गुलाम बनवितात. चांगले जीवन जगता यावे याकरिता समज नसल्यामूळे बुध्दीहीन व्यक्ती आनंदाने बुध्दीमंताचे दासत्व स्विकारतात.

गुलामगिरीची प्रथा मालकवर्गासाठी सुध्दा आवश्यक असून मालक किंवा शासक वर्गात शासन करण्याची क्षमता निसर्गत: असते परंतू त्या क्षमतांचा विकास केवळ समाजात होऊ शकते त्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असते. शासकाजवळ वेळेची आवश्यकता असल्यामूळे साहाजीकच गुलाम असल्यामुळे त्यांची वेळ शासकाला मिळते व ते आपल्या क्षमतांचा विकास चांगल्याप्रकारे करू शकतात असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

## ॲरिस्टॉटलने गुलामांचे दोन प्रकार सांगितले आहे.

१) नैसर्गिक गुलाम किंवा स्वाभाविक गुलाम
२) वैधानिक गुलाम किंवा कायद्याने गुलाम.

नैसर्गिक गुलाम – जन्मत: बुध्दीहीन असणाऱ्या लोकांचा समावेश त्याने नैसर्गिक गुलामात केला आहे. ज्या व्यक्ती निसर्गत:च बुध्दीहीन, अकुशल आणि अयोग्य असतात त्यांना निसर्गाने शारीरिक शक्ती दिलेली असते पण त्याच्याजवळ बौध्दिक क्षमता नसते.

## वैद्यानिक किंवा कायद्याने गुलाम

ॲरिस्टॉटलच्या मते वैद्यानिक गुलामगिरी जन्मजात स्वरूपाची नसते. एखाद्या युध्दात पराभूत झालेल्या सैनिकांना आपल्या देशात आणले जाते तेव्हा त्यांना गुलाम बनवून कायद्याद्वारे त्यांच्यावर गुलामगिरी लादली जाते. यांनाच बैधनिक गुलाम म्हटले जाते. एका ग्रीकाने दूसऱ्या ग्रीकाला गुलाम बनवू नये असे त्याचे मत होत. वैधानिक गुलाम या सदरात ॲरिस्टॉटल युध्दातील कैद्याचा समावेश करतो.

## निष्कर्ष

ॲरिस्टॉटलच्या संपूर्ण विचारावरून असे स्पष्ट होतो की त्याला गुलामगिरी पध्दत मान्य होती. गुलामगिरी मालक व गुलाम यांच्यासाठी कशी आवश्यक आहे हे अतिशय रोचकपणे पटवून देण्याचा प्रयत्न त्याने केला आहे. त्यावेळेस तत्कालीन ग्रीक नगरराज्यातील परिस्थितीनुसार गुलामगिरी त्याला आवश्यक वाटत होती. ॲरिस्टॉटलची सामान्य अनुमान काढण्याची पध्दती व वस्तुस्थितीच्या यथार्थपणे विचार करण्याची पध्दती यामूळे त्याच्या लिखाणावर व तत्वज्ञानावर ग्रीक घटकांचा प्रभाव आढळतो परंतु गुलामगिरी पध्दत मानवतेच्या हृष्टीकोनातून विचार केल्यास कधीही योग्य नाही, असेच म्हणावे लागेल. कारण प्रत्येकाल आपल्या सामर्थ्यानुसार स्वत:चा विकास करण्याचा अधिकार आहे. प्रत्येक मनुष्य जन्माने आणि निसर्गत: वेगळा असला तरी त्याच्यामध्ये एवढे सामर्थ्य असते की, तो स्वत:चा विकास स्वत: करू शकतो.

## संदर्भ

१) प्रा. डॉ. विजय बोबडे –पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, श्री. साईज्योती पब्लीकेशन नागपूर
२) प्रा. रा. ज. लोटे – पाश्चिमात्य राजकीय विचार, पिंपळापूर ॲन्ड कं. महाल नागपूर
३) डॉ. अलका देशमूख – प्राश्चात्य राजकीय विचार, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर
४) डॉ. राठोड आणि चिमणकर – पाश्चात्य राजकीय विचार pdf by google
५) मराठी विश्वकोष खंड पहिला.

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, March 2022, Volume-13, Issue-11

# वस्तु व सेवा कर (जीएसटी) - एक दृष्टीक्षेप

**प्रा.डॉ.तायपाथ व्हि.पी.**
अर्थशास्त्र विभाग, ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

वस्तु व सेवा कर यास इंग्रजीमध्ये Goods and Service Tax असे म्हणतात.तर यालाच संक्षिप्त रूपात जीएसटी असे संबोधले जाते. जीएसटी ची कल्पना सर्वप्रथम इ.स. १९२० च्या दशकात जर्मन उद्योजक विल्येम वॉन सिमेन्स यांनी मांडली आहे. जगातील ब.याच राष्ट्रांमध्ये कर चुकवेगिरी टाळण्यासाठी जीएसटीचे अनुकरणे केले जाते. जगामध्ये जीएसटी कायदा लागू करणारा फ्रान्स हा पहिला देश आहे. इ.स. १९५४ मध्ये जीएसटीचा अवलंब केला गेला. फ्रान्स नंतर जपान, दक्षिण कोरिया आणि ऑस्ट्रेलिया या सारख्या देशांनी जीएसटी सारख्या कायद्याची अंमलबजावणी केली आहे . आज जगात जवळपास १६० देशांनी जीएसटी लागू केला आहे. भारताने १ जुलै २०१७ मध्ये जीएसटी कायदा अंमलात आणला आहे. भारताने डयुएल जीएसटी मॉडेलचा अवलंब केला आहे. सद्यस्थितीत जगात जीएसटीचे ४० पेक्षा जास्त मॉडेल अस्तित्वात आहेत. आज जगात कॅनडा आणि ब्राझील या दोनच राष्ट्रात भारतासारखे डुयअुल मॉडेल मध्ये जीएसटी अस्तित्वात आहे. जेथे केंद्र आणि राज्य यात महसुल विभागला जातो. भारतांने जीएसटीचे कॅनेडीयन डयुअल मॉडेल निवडले आहे. जगातील सुमारे १६० देशातील जीएसटी अथवा व्हॅट या नावाने सर्व व्यवहारांवर एकच कर लावला जातो ती आजवरची सोपी आणि यशस्वी कर प्रणाली मानली जाते. परंतु, त्या अंतर्गत बरेचशे देश आकाराने अथवा लोकसंख्येने छोटे आहेत. एक भाषा, एक स्तरीय शासनामुळे अनेक देशांत एक कायदा अथवा दोन कर दर आहेत . भारताएवढी विविधता कोठेच नाही. भारत देशाचे प्रश्न इतर देशांपेक्षा फार वेगळे आणि गुंतागुतींचे आहेत. आशिया खंडातील श्रीलंका, चीन आणि सिंगापुर या देशाचां समावेश होतो. भारतात १ जुलै २०१७ पासुन एक देश एक कर प्रणाली लागू करण्यात आली आहे. केंद्र शासनाला ही कर प्रणाली लागू करण्यासाठी वस्तु व सेवा कर आकारण्यासाठी नवीन कायदा करून त्याला लोकसभा व राज्यसभेची मान्यता घेउन १२२ वी घटनादुरूस्ती करावी लागली आहे. केंद्र शासनाने तयार केलेल्या वस्तु व सेवा कर कायदा सन २०१७ मध्ये एकुण २१ प्रकरणे, १७४ कलमे आणि तीन परिशिष्टये आहेत. या करप्रणालीच्या अंमलबजावणीमध्ये येणा.या अडचणी सोडविण्यासाठी श्वस्तु व सेवा कर समितीश मा. अर्थमंत्री भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली आहे. ही समिती या कर रचनेविषयी अभ्यास करून जो निर्णय घेईल तो बंधनकारक असेल त्याचबरोबर या प्रणालीच्या अंमलबजावणीमध्ये येणा.या अडचणींविषयी योग्य तो निर्णय घेउन या कायद्याच्या काटेकोर अंमलबजावणीचे दायित्व पुर्ण करील. कोणत्या वस्तुवर किती कर आकारायचा याचा निर्णय ही वस्तु व सेवा कर समिती घेते. या समितीने कर पात्र १२११ वस्तु व सेवा पुरवठा यापैकी १२०६ वस्तुंची कर श्रेणी निश्चीत केली आहे.

**अभ्यासाची उदिष्टये :-**

'भारतातील वस्तू आणि सेवा कर GST एक दृष्टीक्षेप' या लेखावर अभ्यास करत असताना काही उदिष्टये समोर ठेवून लिखान करण्याचा प्रयत्न केला आहे. ती उदिष्टये पुढील प्रमाणे आहेत.

जीएसटी या संकल्पनेची पार्श्वभूमी माहिती करणे.
जीएसटी विधेयकाची पार्श्वभूमी प्राप्त करणे.
जीएसटी ची संकल्पना अभ्यासणे.
जगातील विविध देशातील जीएसटी दर जाणून घेणे.
भारतातील जीएसटी करप्रणालीचे टप्पे/ श्रेणी (Slab Rate) माहित करणे.जी.एस.टी चे स्वरूप माहित करणे.
वस्तू व सेवा करामध्ये अंतर्भुत होणारे केंद्र व राज्यातील कर कोणते ते जाणून घेणे.

**संशोधन पध्दती :-**

'भारतीय वस्तू आणि सेवा कर ;GST) एक दृष्टीक्षेप' हा लेख लिहीत असताना दुय्यम साधनाचा वापर केला गेला आहे. हा लेख लिहण्यासाठी विविध संदर्भग्रंथ, वृत्तपत्रे, नियत कालीके, साप्ताहिके आणि वेगवेगळया संकेतस्थळाचा आधार घेऊन सर्व माहिती उपलब्ध केली गेली आहे. त्यावरून विश्लेषण केले गेले आहे.

## GST विधेयकाची पार्श्वभूमी :-

डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली २००३ मध्ये नेमण्यात आलेल्या जें वितबम ने सर्वप्रथम ही संकल्पना आपल्या अहवालात VAT P;ा तत्वावर आधारित एकीकृत ;न्दपवितउमकद्ध वस्तू व सेवाकराची संकल्पना मांडली होती. सन २०११यामध्ये माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांनी सर्वात अधि वस्तू व सेवा कराचा प्रस्ताव लोकसभेत सादर केला होता. १२२ वी घटना दुरूस्ती विधेयक २०१४ चे वाचन लोकसभेत १९ डिसेंबर २०१४ रोजी अर्थमंत्री अरूण जेटली यांनी केले. त्यानंतर ३ ऑगस्ट २०१६ रोजी विधेयक राज्यसभेने मंजुर केले राज्यसभेकडुन दुरूस्तीसह आलेल्या विधेयकाला लोकसभेने ८ ऑगस्ट २०१६ रोजी मान्यता दिली गेली आणि २१ घटक राज्यांनी आणि २ केंद्रशासीत प्रदेशांनी मान्यता दिल्यानंतर राष्ट्रपतीनी ८ सप्टेंबर २०१६ रोजी मान्यता दिली गेली.भारतात वस्तू व सेवा कर प्रणाली १ जूलै २०१७ रोजी लागू करण्यात आली आहे. GST ला मान्यता देणारी आसाम, बिहार, झारखंड, हिमाचल प्रदेश आणि छत्तीसगड ही पहिली पाच राज्य आहेत. GST विधेयकाला मान्यता देणारे महाराष्ट्र हे दहावे राज्य आहे आणि राज्य ळैज कायदयाला मान्यता देणारे महाराष्ट्र हे देशातील १२ वे राज्य ठरले आहे.

### वस्तू व सेवामध्ये अंतर्भुत होणारे कर :-

केंद्र सरकारकडून सध्या आकारल्या जाणाऱ्या आणि गोळा केल्या जाणाऱ्या तसेच राज्य सरकार कडून आकारल्या जाणाऱ्या आणि गोळा केल्या जाणाऱ्या कराची जागा वस्तू व सेवा कराने घेतली आहे.

### वस्तू व सेवा करामध्ये अंतर्भुत होणारे केंद्रातील कर

अ) केंद्रीय उत्पादन शूल्क, ब) उत्पादन शूल्क (औषधी आणि प्रसाधन सामग्री), क) अतिरिक्त उत्पादन शूल्क (विशेष महत्वपूर्ण वस्तुंसाठी), ड) अतिरिक्त उत्पादन शूल्क (सामान्य पणे सिव्हीडी म्हणुन ओळखले जाते), इ) अतिरिक्त सिमा शूल्क, फ) विशेष अतिरिक्त सिमा शूल्क.
च) सेवा कर

### वस्तू व सेवा करामध्ये अंतर्भूत होणारे राज्यातील कर :-

अ) राज्य मूल्यवर्धित कर, ब) केंद्रीय विक्री कर, क) एष आराम कर, ड) प्रवेश कर, इ) करमणुक आणि मनोरंजन कर, फ) जाहिरातीवरील कर, च) लॉटरी, बेटिंग आणि जुगारावरील कर
छ) वस्तु व सेवांच्या पुरवठयाशी संबंधीत असलेल्या राज्य अधिभार आणि उपकर

### जीएसटी ची संकल्पना –

वस्तू आणि सेवाकर वसूल केला जाणारा अप्रत्यक्ष कर म्हणजे गुड्स आणि सर्विसेस टॅक्स जीएसटी हा नविन प्रकारचा कर नसून कर वसूल करण्याची एक प्रगत पध्दती आहे. हया पध्दतीत वस्तूच्या उत्पादनापासून अंतिम विक्रीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर आणि प्रत्येक सेवा पुरवठयावर हा कर लावला जाईल आणि प्रत्येक टप्यात मागील भरलेल्या कराची वजावट मिळेल.

### जीएसटी चे स्वरूप :-

भारतात ळैज करप्रणाली द्विस्तरीय आहे. म्हणजेच केंद्रशासनाचा वेगळा कर आणि राज्यशासनाचा वेगळा कर असा आहे. केंद्रशासनाचा कर Central Goods & Services Tax (CGST) नावाने असेल तर राज्य शासनाचा कर State Goods & Services Tax (SGST) नावाने असेल. केंद्रात केंद्रशासनाचा स्वतंत्र कायदा पारीत झाला आहे. तर प्रत्येक राज्याचा ळैज कायदा स्वतंत्र पारीत झाला आहे आणि आंतरराज्य पुरवठयासाठी Integrated Goods & Service Tax (IGST) हा कायदा पारीत केला या शिवाय ही केंद्रशासीत प्रदेशासाठी UTGST कायदा समत केला आहे. GST कायदयामुळे जर राज्याचे नुकसान झाले असेल तर ते नुकसान भरपाई अधिभार लावण्यात आला आहे. त्याचा एक वेगळा कायदा पारीत केला आहे.भारतीय जीएसटी द्विस्तरीय आहे म्हणजे एकाच व्यवहारात दोन कर भरावे लागतील. त्यातील एक भाग केंद्रशासनाला दयायचा आणि दुसरा भाग राज्यशासनाला दयायचा.

### भारतातील GST कर प्रणालीचे टप्पे (स्लॅब)–

भारतात जीएसटी कर प्रणाली पाच भागात विभागली आहे. या कर रचनेमध्ये वेगवेगळया वस्तुसाठी व सेवांसाठी वेगवेळी कर श्रेणी निश्चित करण्यात आली आहे. कर प्रणालीत ० टक्के, ५टक्के, १२टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के असे कर आकारणीचे दर आहेत. याशिवाय अपवादात्मक परिस्थितीमध्ये कमाल ४० टक्के कर आकरण्यात

येऊ शकतो प्रत्येक कर श्रेणीमध्ये येणाऱ्या वस्तू व सेवा पुढील प्रमाणे आहेत.

**० : GST अंतर्गत येणाऱ्या वस्तू- ;० : GST)**

वस्तु :- गहू, तांदुळ, आटा, मैदा, बेसन, मुरमुरे, दही, लस्सी, स्वच्छता नॅपकीन्स, संगमरवरी दगडापासून किंवा लाकडापासून बनवलेल्या देवाच्या मुर्ती, राखी, दुध, फळे, भाज्या, ब्रेड, मिठ, बिंदी, सिंदुर, नैसर्गिक मध,बांगडया, हातमाग, अंडी, शिक्के, मुद्रीत पुस्तके, न्यायीक कागदपत्रे, वर्तमानपत्रे, मातीची भांडी, शेतीची औजारे, कानातली ऐकायची मशिन इ.

सेवा - १००० रू पेक्षा कमी किंमतीचे हॉटेल्स आणि लॉज बचत खात्यातील बॅक शुल्क, जनधन योजना

**५ : GST अंतर्गत येणाऱ्या वस्तू- ;५: GST)**

वस्तु :- मिल्क पावडर, फिश फिलेटे, फ्रोजन मधील भाज्या, कॉफी, कोळसा, खते, चहा, मसाले, पिझ्झा ब्रेड, केरोसीन, आयुर्वेदिक औषधे, आगरबत्ती, कापलेल्या कोरडा अंबा, काजू, शाबुदाना, पॅक केलेले अन्न, रू.१००० पर्यंतचे चप्पल बुट, खाद्य तेल, गॅस इ.

सेवा :- रेल्वे आणि वायुमार्गासारखा वाहतूक सेवांसह लहान रेस्टॉरंट्स, एसी आणि नॉन एसी हॉटेल्स, ७५०० रू किंमतीपेक्षा कमी भाडे असलेले रेस्टोरंट्स.

**१२ : GST अंतर्गत येणाऱ्या वस्तू (१२: GST )**

बटर, फळाचा रस, बदाम, साखरची मिठाई, २० लिटरचे पॅक पाणी, ठिबक सिंचन, हॅन्डबॅक पाऊच आणि पर्स, तयार केलेले आरसे, पॅक नारळ पाणी, तयार केलेल्या भाज्या, लोणचे, चटणी, जाम, जेली, नमकीन, फ्रोजन मांस उत्पादने, पॅकेज सुकामेवा (फळे), प्राण्याचे मांस, नोटबुक, १०००रू वरचे कपडे, दात पावडर, चमचे, छाता, शिलाई मशिन, मासे, मोबाईल, १०० रू खालील चित्रपटाचे तिकीट, लुडो, कॅरमबोर्ड, चेस बोर्ड, इ.

**१८ : GST अंतर्गत येणाऱ्या वस्तू (१८: GST )**

बिस्कीटे, चवदार साखर, १०० पेक्षा जास्त किंमतीचे चित्रपटाचे तिकीटे, कॅम्प्युटर, टि.व्ही, टायर, लहान खेळणीच्या वस्तू, व्हिडीओगेम, व्हेक्यूम क्लीनर, केक, पेस्ट्री, संरक्षीत भाज्या, सुप, ब्रीफकेस, च्वींगम, बबलगम , पास्ता, साबण, केसाचे तेल, डिओड्रंन्ट, चेहऱ्याचा मेकअप, दाढी करणे, दाढीचे सामान, कपडे धुण्याचे साबन, पावडर, टूथपेस्ट, प्रसाधन गृह, काजल पेन्सील स्टीक, संगणक, मुद्रित, मॉनिटर, कॅमेरा, सीसीटीव्ही,विद्युत ट्रान्सफॉर्मर, ॲप्टीकल फायबर, बिडी पट्टा, मिनरल वाटर, पोस्टर रंग, लिफाफा, स्टील उत्पादने, स्टेशनरी आयटम, वाशिंग आणि स्वच्छता, वाटर हिटर, केसाचे शावर्स, केसांचे रंग, हेअर ड्रायर, सुगंधी स्प्रे, वार्निश, सुरक्षा काच, सीट्स, फॅन, लाईट फिटींग ,कंप्रेसर, सॅनेटरी वेअर, चमडयाचे कपडे , हातातील घडयाळ, कटलरी, कुकर, कृत्रिम फुले, फळे, व्यायामाची उपकरणे, टीव्ही, एसी, फ्रिज, खिडक्या, दारे, वाटर कलर, डिझेल इंजिनचे भाग, सेकण्ड हॅन्ड कार्स, इत्यादी. वस्तु.

**२८ : GST अंतर्गत येणाऱ्या वस्तू (२८% GST)**

चॉकलेट्स, हेअर क्लीप, विमानाचा वैयक्तीक वापर, ऑटोमोबाईल्स, मोटार सायकल, पान मसाला, तंबाखु, सिगारेट, बीडी, सिमेंट, एटीएम, वेल्डींग मशिन, वजनाचे मशिन इत्यादी.

वरील पाच श्रेणीमध्ये वस्तुची विभागणी जीएसटी मध्ये केलेली आहे. याशिवाय अपवादात्मक परिस्थितीत राज्याना ४० टक्के पर्यंत जीएसटी आकारता येवू शकतो परंतू तसे करण्यासाठी जीएसटी कॉन्सीलची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

**भारत आणि जगातील इतर राष्ट्राचा जीएसटी दर :-**

| Sr.No | Countries | GST Rate % | Sr.No | Countries | GST Rate % |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Singapore | 7 | 23 | Iceland | 24 |
| 2 | Switzerland | 8 | 24 | Irland | 23 |
| 3 | Australia | 10 | 25 | Israle | 17 |
| 4 | Indonesia | 10 | 26 | Italy | 22 |
| 5 | South Korea | 10 | 27 | Kenya | 16 |
| 6 | Japan | 8 | 28 | Korea | 10 |
| 7 | Canada | 5 | 29 | Kuwait | 5 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | Sweden | 12 | 30 | Maldiwes | 12 |
| 9 | United Kingdom | 20 | 31 | Mexico | 16 |
| 10 | Greece | 24 | 32 | Mangoli | 10 |
| 11 | Argentina | 27 | 33 | Netherlands | 21 |
| 12 | China | 17 | 34 | Narway | 25 |
| 13 | Malaysia | 6 | 35 | Pakistan | 17 |
| 14 | Vietnam | 10 | 36 | Poland | 23 |
| 15 | NewZeland | 15 | 37 | Romania | 19 |
| 16 | Ukraine | 20 | 38 | Sowth Africa | 14 |
| 17 | France | 20 | 39 | Spain | 21 |
| 18 | India | 5 to 28 | 40 | Sweden | 25 |
| 19 | Belgium | 21 | 41 | Thailand | 7 |
| 20 | Colombia | 19 | 42 | Turkey | 18 |
| 21 | Denmark | 25 | 43 | United States | 7.25 |
| 22 | Hugarry | 27 | 44 | Zimbabwe | 15 |

Source - http://www.ex.com/gl/en/services/tax/world wide-vat-gstand sales-tax-guide..rates..

वरील तक्त्या मध्ये भारत आणि जगातील इतर राष्ट्रातील जीएसटी दर अभ्यासला असता असे दिसून येते की, कॅनडा कुवेत ५ टक्के, मलेशिया ६ टक्के, सिंगापुर थायलंड आणि युनायटेड स्टेटस चा ७ टक्के, स्वीत्झरलॅन्ड, जपानचा ८ टक्के, ऑस्ट्रेलिया, इंडोनेसीया, साऊथ कोरीया, कोरीया, मंगोलियाचा १०टक्के, स्वीडन, मालदीव १२ टक्के, साऊथ आफ्रीका, न्युझीलंड अनुकमे १४ टक्के आणि १५ टक्के, कोरिया, मेक्सीको १६ टक्के, चीन, इस्त्राईल, पाकिस्तान १७ टक्के, तुर्की १८ टक्के, कोलोम्बिया, रोमानिया १९ टक्के, युनायटेड किंगडम, युक्रेन, फ्रान्स २० टक्के, बेल्झीयम, नेदरलॅन्ड, स्पेन २१ टक्के, इटली २२ टक्के, आयर्लन्ड, पोलॉन्ड २३ टक्के, ग्रीस, आईसलॅन्ड २४ टक्के, डेन्मार्क, नार्वे, स्वीडन २५ टक्के, ॲर्जेन्टीना, हंगेरी २७ टक्के आणि भारताचा ५ टक्के ते २८ टक्के पर्यंत आहे. यावरून असे लक्षात येते की जे देश विकसित आणि लोकसंख्येने, भौगोलीक दृष्टया लहान आहेत. त्यांचा जीएसटी दर कमी म्हणजेच ५ टक्के ते ७ टक्के असल्याचा दिसून येत आहे. जगात भारताचा मात्र जीएसटी दर हा सर्वाधीक आहे तो २८ टक्के पर्यंत आहे.

**भारत आणि जगातील इतर राष्ट्राचा जीएसटी दर आलेखाद्वारे**




**संदर्भ सुची :-**

1. ॲड.गोविंद पटवर्धन, 'असा आहे जीएसटी कायदा अद्ययावत सुधारणासह', सकाळ प्रकाशन जुलै २०१७.
2. पी.पी.देशमुख, उद्योजक, VOL XXVII, ISSUE VII vkWxLV 2017]
3. http://www.mpscmantra.com/
4. http://centrik.in/blogs/list-of-gst-rates-in-different cuntries/

5. https://www.ey.xom/g1/en/service/tax/worldwide-vat-gst-and-seles-tax-guide-rates.
6. https://www.indiatody.inleducation-today/gk-current-affaries/gst-highest-inda-1022203-2017-07-03.
7. https://www.missionmpsc.com/what-is-gst-bill/
8. http://mr.vikaspedia-welfare/other-info/
9. http://maybolilekh.blogspol.com/2017
10. https://mr.wikipedia.org
**11.** https://www.patrika.com/lucknow-news/gst-interwse-tax-rate-list-in-india-

# जलव्यवस्थापणात मध्यम सिंचन प्रकल्पाचे महत्व

**प्रा.डॉ.डी.पी. जावळे**

ज्ञानोपासक कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय परभणी

**प्रस्तावना**:

मध्ययुगीन कालखंडातील सिंचन व्यवस्था इ. स. ( १२०६-१७६१ ) हा कालखंड मध्ययुग म्हणून ओळखला जातो. दिल्लीचा सुलतान राजवटीपासून याची सुरुवात होते तर मराठ्यांनी दिल्ली जिंके पर्यंतचा हा काळ आहे. सुलतानशाहीच्या काळात भारतभर जलसंधारणाचे किरकोळ प्रयत्न झाले. त्या काळातील राज्यकर्त्यांची अल्पशा प्रमाणात असे योगदान आहे मोहम्मद तुगलक यांच्या कारकिर्दीतील पडलेल्या दुष्काळामध्ये मोठ्या प्रमाणात प्राणहानी झाली. तेव्हा मोहम्मद तुघलकाने शेतकऱ्यांना विहिरी खोदण्यासाठी व पडीक जमीन पुन्हा लागवडीखाली आणण्यासाठी उत्तेजन दिले. फिरोजशहा तुघलक यांनी १३५१ साली दिल्ली जवळ पश्चिम यमुना कालवा खोदला. अगबरने १५६८ साली त्यामध्ये सुधारणा केली आणि त्यांचे पाणी हिसार जिल्ह्यात खेळविले. बाबरने भारतामध्ये मुघल सत्तेचा पाया घातला उपसा सिंचनाबाबत पर्शियन चक्र व चरसा सिंचनाचे वर्णन केले. पर्शियन चक्राची दोर बैल पडतात व चक्र वरील पाण्याची भरलेली गाडी एका पाटात रिक्त होतात व हे पाणी शेतीला पुरवले जाते. चोर असा पद्धतीचे वर्णन बाबरने केले आहे. सर्व मोगल सम्राट पैकी अकबर हा सर्वश्रेष्ठ सम्राट होता परंतु त्यांच्या कारकिर्दीतील सिंचन पद्धतीबद्दल कुठेही इतिहासकारांनी त्यांच्या लेखनात उल्लेख केलेला नाही. दक्षिण भारतामध्ये विजयनगरचा दुसरा राज्य करता पहिला बुक

( इ.स.१३३५-१३७७ ) यांचे यांनी सिंचनाचे कामे मोठ्या प्रमाणावर सुरू केली. कडप्पा जिल्ह्यातील पोरूमामतीसा तलाव किंवा आनंदराज सागर त्यावेळी जास्त प्रसिद्ध पावले. पहिल्या बुक च्या काळातील मिळालेल्या शिलालेखावर धरणाची जागा कशी निवडावी यांच्या कसोट्या दिल्या आहेत. त्या कसोट्या आजही उपयुक्त ठरतात. पहिला व दुसरा देवराय आणि कृष्णदेवराय हे विजयनगर साम्राज्याची सुप्रसिद्ध राज्यकर्ते होते कोरडवाहू जमिनी च्या मोठ्या पट्ट्यामध्ये कृषी उत्पादन वाढावे म्हणून त्यांनी सिंचनास मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले त्यांच्या कारकीर्दीतील सुप्रसिद्ध कोरंगळा धरण व कालवे बांधले. मध्ययुगीन महाराष्ट्रातील सिंचनाची जुनी, उत्तम व्यवस्था मराठवाड्यामध्ये बीड शहराजवळ खजाना विहिरींमधून कार्यवाही झालेली दिसते .१५७२ साली 212 हेक्टर शेती ओलिताखाली आणण्यासाठी निर्माण करण्यात आली होती.

अहमदनगरच्या निजामशाही तील शेवटचा पंतप्रधान मलिक अंबर यांनी पाण्याच्या विकासाचे खूप प्रयत्न केले.त्यांचे सैन्य रयत व आणि लोकांसाठी देवगिरी एक्स किल्ल्यासमोरील सुलतान टेकडीच्या पायथ्याशी एक मीटर उंचीची व साधारण दोन किमी लांबीची भिँत पायथ्यापासून सुलतान टेकडीच्या माझ्यापर्यंत बांधली. पावसाचे पाणी अडवून वक्र मालिकेच्या माध्यमातून ते पाणी किल्ल्यामध्ये खेळविले होते. दुसऱ्या योजनेमध्ये पाच पर्वतांच्या बाजूच्या दरीत पातळीवरील तलाव शृंखला निर्माण करून तेथून कालवे व मातीच्या नळाद्वारे किल्ल्यात पाणी पुरवठा करण्याचा प्रयत्न केला होता.इ.स.१६०५ ते १६२६ मध्ये याच पद्धतीच्या योजना औरंगाबाद औसा कंधार नळदुर्ग इत्यादी ठिकाणी राबविल्या. मालगुजारी पद्धतीची तलाव नांदेड परभणी लातूर व उस्मानाबाद च्या काही भागात बांधले गेले होते वहिनी गंगेच्या खोऱ्यात चंद्रपूर गडचिरोली भंडारा व नागपूर या जिल्ह्यात जवळजवळ दहा हजार तलाव कोहली जातीच्या लोकांनी स्वतःची श्रम व पैसा खर्च करून बांधले आहेत तलावांच्या पाण्याचा पुरवठा पुराचा धोका गावाला पोहोचत नाही .एका तलावातील पाणी दुसऱ्या व त्यांची तिसऱ्या तलावात अशी शृंखला निर्माण करून पाण्याचा नाश न होता त्या पाण्याचा पुन्हा वापर करण्याचे तंत्र वापरण्यात आले आहे जमिनीवर पाण्याची साठे निर्माण करून भात ऊस या पिकाच्या उत्पादनासाठी हे तलाव बांधण्यात आलेले आहेत. वरील सर्व गोष्टी पाहिल्यास आपणास असे म्हणता येईल की मध्यम सिंचन प्रकल्प छोटा प्रकल्प व मोठे प्रकल्प ही शेतकऱ्याच्या दृष्टीने आणि सरकारच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत देशाचा किंवा आपल्या राज्याचा विकास करण्यासाठी चिंतनाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे त्यासाठी मध्यम सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून जास्तीत जास्त जल साठवणूक करून त्या ठिकाणी कशा प्रकारे सर्व

शेती ओलिताखाली आणता येईल हाच विचार मनामध्ये ठेवून सरकारने निर्णय घेणे अभिप्रेत आहे.

**उद्दिष्ट्ये**:

१). मध्यम सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून शेती विकासाला चालना मिळाली आहे का? हे पाहणे

२) मध्यम सिंचन प्रकल्प व कृषी विकास यांचा परस्पर संबंधाविषयी अध्ययन करणे

३) सिंचन प्रकल्पाचे प्रकार जाणून घेणे

**गृहीतके :**

१) मध्यम सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण विकास साध्य होत आहे

२)मध्यम सिंचन प्रकल्पामुळे पाणी वाहून जाण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

**१) मोठे व मध्यम प्रकल्प:**

भारताच्या आर्थिक नियोजनामध्ये मोठ्या व मध्यम सिंचन प्रकल्पांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. जे बहुउद्देशीय प्रकल्प सरकारने हाती घेतले आहेत किंवा पूर्ण केले आहेत त्यांच्याद्वारे शेतीला पाणीपुरवठ्याची सुविधा तर होतेच शिवाय अतिरिक्त पाणी साठवणे पूरनियंत्रण, विद्युत निर्मिती जलवाहतूक यासारखे इतरही फायदे होतात या मोठ्या प्रकल्पामुळे काही समस्याही उद्धवतात म्हणजे जे प्रकल्प जसे फायदे आहेत तसे त्यांचे काही दोष सुद्धा आहेत उदाहरणार्थ मोठ्या प्रकल्पासाठी फार मोठी गुंतवणूक भांडवली गुंतवणूक करावी लागते व ते पूर्ण होण्यासाठी लागणारा कालावधी बराच मोठा असतो प्रकल्प हाती घेतल्यानंतर धरणाचे बांधकाम पूर्ण संग्रहीत करण्याची सोय कालवे बांधणे इत्यादी कामे करावी लागतात. व त्यासाठी अवाढव्य खर्च करावा लागतो. इतके करूनही प्रकल्प त्वरित पूर्ण होणार नसल्याने त्याचा फायदा दीर्घकाळ मिळतो.

सिंचन प्रकल्पाची आकार व प्रकार आपणास खालील प्रमाणे त्यांच्या क्षेत्रानुसार किंवा सिंचन प्रकल्पाच्या त्यांच्या क्षेत्र अनुसार वर्गीकरण करण्यात आलेले आहे ते खालील प्रमाणे आपणास पाहता येईल

१) मोठ्या सिंचन प्रकल्पातून जय सिंचन केले जाते त्यांची लाभक्षेत्र दहा १०,०००हेक्टर

पेक्षा जास्त असते

२) मध्यम सिंचन प्रकल्पाचे लाभक्षेत्र २००० हेक्टर पेक्षा जास्त परंतु १०,०००हेक्टर पेक्षा कमी अशा प्रकारचे असते.

३) लघु सिंचन प्रकल्पाचे लाभक्षेत्र जास्तीत जास्त दोन हजार हेक्टरपर्यंत असते म्हणजेच २००० हजार हिटर पेक्षा कमी लाभक्षेत्र असलेल्या सिंचन प्रकल्पाला लघुसिंचन प्रकल्प असे नाव देण्यात आले आहे.

**२) मध्यम सिंचन प्रकल्पाच्या विकासाचे उद्देश**

मध्यम सिंचन प्रकल्पाला नैसर्गिक सीमा असल्यामुळे त्या सीमांच्या अधीन राहून विविध बाबी चे नियोजन व त्यानुसार कृती करणे हे शक्य असल्यामुळे मध्यम सिंचन हा घटक घेऊन विकास योजना तयार करणे महत्त्वाचे आहे . मध्यम सिंचन प्रकल्पांमध्ये पडलेल्या पावसाचे तसेच जमिनीचे व इतर साधन संपत्तीचे पुरेपूर फायदा घेता येतो. प्रत्येक मध्यम सिंचन प्रकल्पातील वनस्पती , जमीन ,इत्यादी गुणधर्म त्यावर पवन पडणारा पाऊस व त्यांचे गुणधर्म सारखेच असतील असे नाही .तसेच काही विशिष्ट भूभागावर राहणाऱ्या लोकांचे जीवनमान त्यांच्या गरजा या अन्य भूभागावरील लोकांपेक्षा भिन्न असू शकतात .प्रत्येक मध्यम सिंचन प्रकल्प क्षेत्रामध्ये विशिष्ट अशा सामाजिक व आर्थिक स्तर असतो समान गुणधर्म व समान समस्या असणाऱ्या मध्यम सिंचन क्षेत्र विकास म्हणजे त्या क्षेत्रातील उपलब्ध जमीन पाणी वनस्पती इतर नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य रीतीने वापर करणे जेणेकरून पुढील वैशिष्टे सफल होतील त्यात जमीन दूध थांबवणे पाणी अडवून जिरवणे जेणेकरून जमिनीतील पाण्याचे पुनर्भरण होईल कृषी उत्पादन वाढवणे जैविक समतोल राखणे इंधन व चारा उपलब्ध करणे व प्रकल्प कालावधीत पूर्तता नंतर रोजगार संधी उपलब्ध करून देणे

**निष्कर्ष :**

१) मध्यम सिंचन प्रकल्पामुळे सिंचित क्षेत्र वाढ झाल्यामुळे शेतकरी 90% उत्पादन घेण्यावर भर देत आहे

२) मध्यम सिंचन प्रकल्पामुळे सिंचनाचे पाणी शेतीला भेटत असल्यामुळे किंवा मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक सामाजिक स्तर उंचावला आहे

३) सिंचन प्रकल्पामुळे शेतकरी वर्षातून दोन ते तीन पीक आरामशीर उत्पादन काढत असतो

**शिफारशी:**

१) पाण्याचे कालवे यांचे बांधकाम योग्य अशा पद्धतीने करावी कालव्याची नियमित देखभाल शासकीय यंत्रणेकडे असावी.

२) पाण्याचे व्यवस्थापन शेतीसाठी कसे करावे या संदर्भात वाल्मिकी तर्फे गावातील निवडक लाभार्थी शेतकऱ्यांना शासनाकडून गाव पातळीवर मोफत हंगामी आहे प्रशिक्षण देण्यात ते सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना देण्यात यावे.

३) प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यासाठी पूरक व्यवसायाला शासनाने 75 टक्के अनुदान द्यावे.

**संदर्भ सूची :**

१) Rao N.N. : " Economic of water-supply " Himalaya Publishing House New Delhi.
2) Renis Likert : Human Organization Management and Values Mcgraw Hill Book W .New Delhi,1967
3)Mishra K.M. : " Irrigation and Economic Development " Athlantic Publishers, New Delhi, 1990
4) ढमढेरे एस. व्ही., "महाराष्ट्रातील जलसंपदा" डायमंड पब्लिकेशन, पुणे२००९
५) मोरे दि .मा . "सिंचन साधना", महाराष्ट्र सिंचन सहयोग लाभक्षेत्र, विकास भवन परिसर ,औरंगाबाद, २०१०
६) शिंदे अण्णासाहेब : इस्राईलच्या पाणी प्रश्नाचे स्वरूप इस्रायलची तोंडओळख ,दत्त शुगर एम्प्लॉईज, को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड शिरढोना.

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, March 2022, Volume-13, Issue-11

# स्त्रिभ्रूण हत्याः एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. अभय श्रीहरी लाकडे**
सहाय्यक प्राध्यापक, फुले—आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली.
Email- abhaylakadek@gmail.com

**सारांश**:— स्त्रीभ्रूण हत्या हे एक गंभीर समस्या आहे, की ज्यामुळे दिवसेंदिवस मुलींच्या संख्येत घट होत आहे. आज स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या प्रमाणात कमी आहे ते फक्त आपल्याला पुत्रचं हवा या हव्यासापोटी कन्या गर्भाचा गर्भपात केला जातो. त्याला स्त्रिभ्रूणहत्या म्हटल्या जाते. गर्भपात करताना स्त्रियांच्या आरोग्याचा व मानसिकतेचा कुठलाही सारासार विचार न करता कन्या नको म्हणून, गर्भपात करतात.

**प्रस्तावना** :—

समाज व्यवस्थेने आई, बहीणीला स्विकारले आहे, पण मुलगी नाही. गर्भपातापुर्वी गर्भलिंग परिक्षण केले जाते. कोरोयोनिक आणि बॉयाप्सी (CVBT) या तंत्रज्ञानाने सहज शक्य झाले आहे. परंतू हे आधुनिक तंत्रज्ञान जन्मजात आरोग्याचा किंवा गर्भपात असलेल्या विकृतीचा अभ्यास करण्याकरीता वापरण्या येते. तंत्रज्ञानाचा उपयोग नवीन तथ्ये शोधण्याकरीता होत असतो. परंतू समाजातील मानसिकता या तंत्रज्ञानाचा गैर उपयोग करते, व त्यामुळे देशातील व देशाबाहेरील अनेक स्त्रिया गर्भलिंग परिक्षणाला व गर्भपाताला बळी पडत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान विकसीत होण्यापूर्वी राजस्थान राज्यात मुली जन्मल्यानंतर अघोरी पद्धतीने मारुन टाकण्यात येत होती. मुलगी जन्माला येताचं दुधाच्या मोठ्या भांड्यामध्ये बुडवून गुदमरुन मारत होते. या अघोरी प्रथेला विरोध झाला. परंतू या प्रथेला कायद्याने बालअपराध घोषीत केल्याने ही प्रथा बंद झाली. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान उपयोगात आणून सोनोग्राफीने गर्भपरिक्षण केल्या जाते. यामध्ये कन्येचा गर्भ आढळल्यास गर्भपात करण्याकरीता औषधीचा व शस्त्राचा वापर केला जातो. भारतामध्ये स्त्री—पुरुष समानता, विषमता असल्यामुळे लिंगभेदाला चालना मिळाली. त्यामुळे स्त्रिभ्रूण हत्या एक जटील समस्या निर्माण झाली. भारतामध्ये दरवर्षी ६० लक्ष मुलींचा गर्भपात केला जातो. बऱ्याच वेळा गर्भपात करताना स्त्रिया मृत्युमुखी पडतात. गर्भलिंग परिक्षण हे व स्त्रीभ्रूणहत्या हे एक प्रकारे कौटूंबिक अत्याचार होय. जागतिक पातळीवर गर्भलिंग परिक्षणाचा वा गर्भपात समस्येचा विचार केल्यास, आशिया खंडामध्ये मुलाच्या तुलनेत मुलींचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसुन येते. पुरुष प्रधान संस्कृतीच्या वर्चस्वामुळे मुलगा वंशाचा दिवा आहे, हि मानसिकता समाजामध्ये रुढ झाली आहे. त्यामुळे कन्येचा गर्भ आढळल्यास सहजरित्या नवरा, बायकोचा गर्भपात करतो. बऱ्याचदा गर्भपतामुळे महिलांना कौटूंबिक अत्याचाराला सामोरे जावे लागते. लिंगभेदाचा आढावा घेतला असता. २००९ च्या जणगणनेनुसार भारतामध्ये एकुण लोकसंख्येमध्ये पुरुषांची संख्या ५३,१२,७७,०७८ तर ४९,७७,३१,६६९ स्त्रिया आहेत.

स्त्रिभ्रूण हत्या लिंगभेदातून होत आहे. स्त्रि आणि पुरुष यांच्या शारीरिक दृष्ट्या भिन्नता आहे. वास्तविक लिंग निसर्ग निर्मित आहे. पूढे समाजव्यवस्थेत लिंगभेद सातत्याने केला गेला. हि एक दुर्देवाची बाब आहे. ज्या समाजव्यवस्थेमध्ये स्त्रि आणि पुरुष एकमेकीचे सहायक मानल्या जाते. त्या समाजव्यवस्थेत लिंगभेद आढळतो.

**अध्ययनाचे उददेशः—**

१. स्त्रिभ्रूण हत्येच्या कारणांचे अध्ययन करणे.
२. महिलांच्या आरोग्य स्थितीचे अध्ययन करणे.

**अध्ययनाचे उपकल्पनाः—**

१. स्त्रिभ्रूण हत्येस पुरुषी महत्वाकांक्षा जबाबदार आहे.
२. स्त्रिभ्रूण हत्येमुळे महिलांची आरोग्यस्थिती खालावत आहे.

**स्त्रिभ्रूणहत्येची कारणे :—**

स्त्रि आणि पुरुषामध्ये सामाजिक व सांस्कृतिक कर्तव्ये व अधिकाराबाबत असमानता म्हणजे लिंगभेद होय. स्त्रिभ्रूणहत्येमागील करणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) मुलींपेक्षा मुलाला अधिक महत्व :—**

मुलगा हा वंशाचा दिवा आहे. पित्याचा वंश मुलगा चालवू शकतो. मुलगी ही दुसऱ्याचे धन आहे. अर्थात मुलगी परक्याचे धन आहे. हि समाजामध्ये मानसीकता बळावली असल्यामुळे केवळ मुलालाच महत्व दिले आहे. त्यामुळे स्त्रिभ्रूणहत्ये मागील हे महत्वाचे कारण आहे. असे आपल्याला मानता येईल. कुटूंबाला वारसदार हवा असतो. कुटूंब पुढे चालविण्यास मुलगा आवश्यक आहे. म्हातारपणास आधार म्हणुनही मुलाकडे बघीतल्या जाते. म्हणून कुटूंबात मुलास अधीक महत्व देत असतात व स्त्रिभ्रूण हत्या करुन मुलाची वाट बघतात.

**२) कौटूंबिक अत्याचार :—**

कौटूंबिक अत्याचार पिडीत महिला बऱ्याचदा स्त्रिभ्रूणहत्येला बळी पडल्या असतात. गर्भामध्ये कन्या भृण असल्यास भृणहत्या केली जाते. कुटूंबामध्ये स्त्रियांवर विविध प्रकारचे अत्याचार केले जातात. त्यापैकी स्त्रिभृणहत्या एक आहे. कुटूंबातील सदस्यांच्या आग्रहास्तव पत्नीकडून स्त्रिभृणहत्या करवून घेतली जाते. तिने जर मान्य केले नाही तर कुटूंबातून बऱ्याच जाचा स्विकारावे लागते. कुटूंबातील सदस्य आपल्यावर अत्याचार करतील या भितीपोटीसुध्दा महिला भ्रूण हत्या करण्यास तयार होतात.

**३) गर्भलिंग चाचणी :—**

तंत्रज्ञानाने भारत विकासाच्या मार्गावर आहे पण गर्भलिंग चाचणीच्या तंत्राने मात्र भारतात नविन समस्या निर्माण करण्यास कारणीभूत ठरत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने गगणभरारी घेतल्याने बहुतांश निदान झटपट होते. गर्भलिंग चाचणी सहजरित्या होत असल्याने अचूक लिंग परिक्षण होते. कन्याभृण असल्यास गर्भपात केल्या जातो. म्हणून तंत्रज्ञानाने केलेली प्रगती काही प्रमाणात स्त्रिभृण हत्या वाढण्यास जबाबदार ठरले आहे.

**४) कायद्याचे उल्लंघन :—**

कायदा हा नियंत्रणासाठी तयार केलेला आहे परंतू कायदा निर्माण करतांना त्यामध्ये स्पष्टता नसल्याने त्या संदिग्ध कायद्याचा वापर करुन गैरकृत्य करतात. स्त्रिभृणहत्या प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असतांना सुद्‌धा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ च्या तरतुदी कलम ३ नुसार स्त्रिच्या संमतीशिवाय गर्भपात करता येत नाही. तरि तिच्या असंमती किंवा भावनेकडे दुर्लक्ष करुन कन्या भृण असेल तर गर्भपात केल्या जाते. कायद्याचे संरक्षण असले तरी सामाजिक मापदडाअन्वये कायद्याला मानता स्त्रिभृण हत्या करण्यास प्रेरीत होतात किंवा करतात.

**५) हुंडाप्रथा :—**

हुंडा प्रथा ही समाजाला लागलेली एक किड आहे. हुड्यामुळेच कितीतरी कुटूंबे उध्दवस्त झाली आहेत. हुंडा ही ज्वलंत बनली आहे. त्यामध्ये वस्तु अथवा रोख पैशाच्या स्वरुपात व्यवहा केले जाते. मुलीचा विवाह म्हटला की, हुंडा आलाच. पण आर्थिकदृष्ट्या कमकुवत व्यक्ति हुंड्याची मागणी पूर्ण करु शकत नाही. पुढे मुलीच्या लग्नाची वा हुंड्याची भानगडच नको त्या अगोदरच उपाय केलेला बरा. या कारणाने पत्निच्या गर्भात कन्या आहे लक्षात येताच गर्भपात करण्यात येते. आधिच गर्भपात केल्याने मुलीच्या जन्माला व त्यानंतर, हुंड्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही. त्यामुळे स्त्रिभृणहत्या हुंड्याच्या समस्येवरील उपाय म्हणून केल्या जाऊ लागला. परंतू हुंडा प्रथेबरोबरच स्त्रिभृण हत्या ही एक ज्वलंत समस्या समाजात निर्माण झाली व त्यामुळे अनेक गंभीर प्रश्न समाजात निर्माण होत आहेत.

**६) पुरुषप्रधान मानसिकता :—**

आजही पुरुषांनीच अनेक अधिकार स्वत:पत सीमीत ठेवलेले आहेत. केवळ आपल्या पोटी मुलगाच जन्माला यावा ही स्त्रियांची मानसिकता या पुरुष प्रधान संस्कृतीला वाव देण्याचे काम करीत आहे. हि भावना समाजाने स्त्रियांच्या मनामध्ये निर्माण केल्या गेल्यामुळे स्त्रिभृणहत्या होत आहेत. स्त्रियांप्रति असलेली असंवेदनशिलता स्त्रियांच्या असुरक्षीततेस कारणीभूत आहे. मुलाला जन्म देण्यात आईलाही अभिमान वाटतो आणि मुलगी गर्भात असेल तर कन्या गर्भपाताचा निर्णय घेतला जातो.

कायद्यामध्ये सुधारणा करुन १९९४ मध्ये गर्भलिंग परिक्षणावर पूर्णपणे बंदी आणल्यास गेली. तरी गर्भलिंग निदानास आळा बसला नाही. कायदा गुडाळला जातो, त्यामुळे गर्भलिंग परिक्षण करुन भृणहत्या केली जाते.

**भृणहत्येचे दुष्परिणाम :—**

गर्भलिंग परिक्षण या गर्भपात कायद्यावर बंदी आणली आहे. तरी कायद्यामध्ये अनेक पळवाटात कायद्याचे उल्लंघन करणारे शोधत असतात. कन्या भृणहत्येचे हे दृष्टचक्र सतत सुरुच राहीले तर त्याचे दुष्परिणाम समाज व्यवस्थेला भोगावेच लागेल. यात तिळमात्र ही शंका नाही. स्त्रि भृणहत्येमुळे पुरुषाच्या तुलनेस स्त्रियांची संख्या कमी होत आहे. भविष्यात हेच प्रमाण वाढत गेले तर अनेक समस्या निर्माण हातील.

**१) मुलींचे प्रमाणात घट :—**

स्त्रि भृणहत्या सातत्याने होत गेल्या तर हजार पुरुषांमागे असणारे स्त्रियांचे प्रमाण कमी होईल. अर्थात मुलींच्या प्रमाणात घट होईल. समाजातील मुलींच्या प्रमाणात घट उद्‌भवल्यास समस्या निर्माण होईल. व त्यामुळे समाजातील स्त्रि—पुरुष लोकसंख्येच्या तफावाने अशांतता, कलह, संघर्ष, अराजकता निर्माण होऊन सामाजिक स्वास्थ बिघडेल.

**अ) अपहरण :—**

मुलांचे प्रमाण वाढले की, विवाहास त्या प्रमाणात विवाहयोग्य मुली मिळणार नाही. त्यामुळे मुलींचे अपहरणाचे प्रमाण वाढेल. विवाहाकरीता मुलींचे अपहरण केल्या जाईल. त्यामुळे महिला सुरक्षीतता हा कळीचा मुद्‌दा येत्या काळात बनेल त्यावेळेस आश्चर्य वाटू नये.

**ब) बलात्कार :—**

मुलींचे प्रमाण कमी झाले की, मुलांना विवाहास मुली मिळणार नाही, लैंगिक भुक समाजमान्य मार्गाने न भागविता बळजबरीने लैंगिक भुक भागविल्या जाईल. बलात्काराचे प्रमाण वाढल्या जाईल. समाजामध्ये लैंगिक अत्याचारेत वाढ होईल.

क) बहुपतीविवाह :—

स्त्रिभ्रूण हत्येमुळे मुलींच्या संख्येत मुलांच्या तुलनेत बरेच प्रमाण कमी आहे. विवाह योग्य उपवर मुलांना मुलीं मिळणे अशक्य होत आहे. त्यामुळे बऱ्याच मुलांना विवाहासाठी मुलींकरीता भटकंती करावी लागते. बरेच परप्रांतीय मुले—मुलीं विवाह करीता बाहेर जात आहे. त्यावरुन आपल्याला समाजात अशीच स्थिती राहील्यास. एक वेळ अशी येईल की, अनेक पुरुषांना एकाच स्त्री सोबत लग्न करावे लागतील. व बहुपतीविवाह प्रथा परत सुरु होईल की काय अशी स्थिती समाजात स्त्रिभृण हत्याच्या प्रकरणामुळे निर्माण होत आहे.

**२) स्त्रियांच्या आरोग्यावर वाईट परिणाम :—**

स्त्रियांच्या आरोग्याबाबत समाज आजही जागृत नाही. स्त्रियांच्या आरोग्याचा कुठलाही विचार न करता बऱ्याचदा गर्भपात केले जाते. स्त्रियांचे गर्भपात असुरक्षितपणे करणे. बऱ्याचदा गर्भपात करताना महीला दगावतात. वारंवार गर्भपात केल्याने काही स्त्रिया पून्हा गर्भवती राहू शकत नाही. काहींमध्ये गर्भपिशवीचे आजार होते. त्यामुळे गर्भपीशवी काढुन टाकावी लागते. त्यामुळे अशा

स्त्रियांचे मानसीक व शारीरिक आरोग्य खालावते व त्याचा वाईट परिणाम त्यांच्या दैनंदिन कामकाजावर पडतो.

**निष्कर्ष:—**

१. स्माजात गर्भ लिंग निदान करणे कायदयाने गुन्हा असून देखील समाजात आजतागायत सुरू आहे.
२. स्माजात आजही स्त्री—पुरुष असमानता पाडली जाते.
३. महिला वर्ग आपल्याला मुलगा हवा अशी मनात इच्छा बाळगून असतात.
४. महिलाकडे समाज अजूनही अगतिकतेने बघतो.
५. महिलांना आरोग्यविषयक शिक्षणाची आवश्यकता आहे.
६. पुरुषी मानसिकतेत अजुनही स्त्रियांप्रती दृष्टीकोनात बदल दिसून येत नाही.

**स्त्रिभृण हत्यांवर उपाययोजना :—**

आजच्या परिस्थितीचा विचार केला तर स्त्रियांचे कर्तत्व मोठे असल्याचे दिसत आहे. असे कोणतेही क्षेत्र राहिलेले नाही, ज्यामध्ये स्त्रियांनी नेतृत्व स्विकारलेले नाही. शालांत, माध्यमीक, उच्चमाध्यीक, विद्यापीठीय परिक्षांमध्येही मुलीच आघाडीवर आहेत. असे असताना मुली नको म्हणणारे आपल्याच पायावर धोंडा मारुन घेत आहेत. याची जाणीव त्यांना आलेली नाही. समाज रुढीला चिकटून, समाजाला घाबरुन मुलाच्या प्रतिक्षेत स्त्रीभृण हत्या करणाऱ्या पालकांना सामाजिक संस्थांनी, कार्यकर्त्यांनी बळ देण्याची आवश्यकता आहे. गरीब घरातील मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी अशा संस्थांनी घेतल्यास या प्रकाराला बऱ्याच प्रमाणात आळा बसेल. परंतु यात म्हणावी तशी प्रगती दिसून येत नाही. अशा संस्थांनीही मुलींच्या समप्रमाणसाठी पावले उचलण्याची गरज आहे. शिवय जी मंडळी मोठमोठ्या प्रमाणात देवस्थानांना देणगी देतात. याच पैशातून अनेक गरीब मुलींचा उदरनिर्वाहासाठी आणि शिक्षणाच्या सोयी हा पैसा खर्च केल्यास बऱ्याच प्रमाणात आर्थिक कारणामुळे होणाऱ्या स्त्रिभ्रूण हत्या थांबविणे शक्य होईल. ''देशसेवा हीच ईश्वरसेवा आहे'', अशी वाक्ये केवळ पुस्तकातच राहिली आहेत. ती उपाययोजनेत यायला हवी.

स्त्रीभृण हत्या याचे विमोचन करण्याकरीता समाजातील सर्व घटकांमध्ये मदतीची, सहकार्य, जाणीवजागृती, मानसीक परिवर्तनासाठी प्रसारमाध्यमे (वर्तमानपत्रे, टेलीविजन, रेडीओ, इंटरनेट) याद्वारे प्रचार करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रसारमाध्यमाद्वारे स्त्रिभृण हत्येचे सत्र असेच चालू राहीलेत तर समाजात काय चित्र उभे राहू शकते यांचे उदाहरण आताच समाजासमोर दिल्यास समाजमण बदलेल. त्याकरीता पाया खंबीर करण्याकरीता ज्यामुळे समस्या निर्माण झाली आहे त्यांच्या मुळावर घाव घालण्या करीता समाजातून ह्याची सुरुवात करणे गरजेचे आहे. शासकीय, गैरशासकीय संस्था, समा. कायकर्ते, शिक्षक यांनी सुध्दा समाजात परिवव्रनासाठी आपल्या स्तरावरुन मार्गदर्शन केल्यास आपण स्त्रिभ्रूण हत्येवर आळा घालू शकतो व समाजामध्ये जे स्त्रि—पुरुष संख्येत असंतुलनामुळे ज्या समस्या निर्माण होत आहेत. त्यांच्यावर मात करुन समाजात शांततेचे वातावरण निर्माण करण्यास मदत होणार आहे.

**स्त्रि—भृण हत्येवर उपाययोजना :—**

गर्भपात व गर्भलिंग बंदि कायदा :

कायद्यानुसार कोणत्याही स्त्रिचा गर्भपात करणे गुन्हा आहे. कलम ३० नुसार गर्भपात करणे शिक्षेस पात्र आहे. गर्भपात करणाऱ्यास ३ ते ७ वर्षाच्या शिक्षेस पात्र असतो. त्याचसोबत गर्भपात करणाऱ्यास मदत करणे अथवा प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तिस गुन्हेगार ठरवू शकतात. परंतु १९७१ MTP ॲक्टनूसार तो शिक्षेस पात्र असेल.

नुसार :—

१) गर्भवती स्त्रिच्या जिवीतास धोका होत असेल तर गर्भपात करता येतो.

२) गर्भात असणारी मुल अपंग किंवा बौद्धिक, शारीरिक दृष्ट्या अपंग असेल तर गर्भपातास अनुमती देता येते.

३) स्त्रिचा गर्भ १२ आठवड्यापेक्षा कमी असेल तर गर्भपात करता येतो.

४) एखाद्या स्त्रिला बलात्कारातुन गर्भधारणा झाली असेल तर तिची संमती घेवून गर्भपात करता येतो. किंवा १८ वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या मुली बौद्धिक दुर्बल वेडी असेल तर पालकांच्या संमतीशिवाय गर्भपात करता येत नाही.

वरिल कायद्यामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार सुधारणा करण्यास आली. नोंदणीकृत डॉक्टरांकडे अधिकार बहाल करण्यात आले. परंतु पुढे गर्भलिंग निदान व गर्भपाताचे प्रमाण कमी न होता वाढले. त्यामुळे २००३ मध्ये कायदा कठोर करण्यात आला असून गर्भलिंग परिक्षणावर पूर्णता बंदी आली.

**संदर्भ** :—

१. काचोळे दा.धो. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या कैलाश पब्लीकेशन गोकुलवाडी औरंगाबाद प्रथमावृत्ती सप्टेंबर २००५
२. रा.ज. लोटे भारतीय समाज आव्हाने आणि समस्या पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर जून २००९
३. डॉ. दा.धो. काचोळे भारताच्या विघटेनात्मक समस्या कैलाश जून १९९८
४. डॉ. मा. कि. खडसे भारतातील सामाजिक समस्या श्री मंगेश प्रकाशन रामदास पेठ नागपूर २००९
५. डॉ. संजय साळीवकर सामाजिक समस्या आणि समाज सुधार चळवळ रामदास पेठ नागपूर २००९
६. प्रा. डी.एल. ठोखणे, प्रा. सौ. जयश्री महाजन प्रशांत पब्लिकेशन्स पुणे २००८
७. प्रा. पी. के. कुळकर्णी भारतातील सामाजिक समस्या विद्या प्रकाशन नागपूर १९९८
८. डॉ. प्रदिप आगलावे भारतीय समाज संरचना आणि समस्या श्री. साईनाथ प्रकाश धरमपेठ नागपूर १० प्रथमावृत्ती
९. डॉ. बी.एम. कऱ्हाडे भारतीय समाज प्रश्न आणि समस्या पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर जून २००९

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, March 2022, Volume-13, Issue-11

# महिला सक्षमीकरणाची सद्यस्थिती

**प्रा. स्वप्नाली प्रवीण बिरनाळे**

सहाय्यक प्राध्यापक डॉ. डी वाय पाटील आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज ,आकुर्डी ,पुणे

**प्रस्तावना :-**

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत महिलांचा सहभाग हा जवळजवळ निम्मा आहे. आपल्या देशाला लाभलेले संस्कृती परंपरा अध्यात्मक व भौगोलिक विविधता यामुळे एक वेगळे पण मिळाले आहे, ही नाण्याची एक बाजू आहे. तर दुसरीकडे तर दुसरीकडे त्याच देशात असणारी पुरुष प्रधान संस्कृती ही सर्वात महत्त्वाची बाब आहे त्याच वेळी यास आपल्या समाजात या स्त्रीला आदिशक्तीचे रूप मानली जाते, तेव्हा समाजात महिलांना घरात आणि समाजात वेगवेगळे बंधना मध्ये अडकवून ठेवले जात आहे. समाजात असणारे दुय्यम स्थान आणि दुसरीकडे आपण स्त्री-पुरुष समान त्याच्या गोष्टी बोलत असतो महिलांना स्वातंत्र्य व अधिकार या विषयी जाणीव करून दिली पाहिजे. महिला सक्षमीकरणासाठी केंद्र शासन आणि राज्य शासन सातत्याने प्रयत्न करत आहे. महिलांना त्यांच्या मूलभूत हक्क व अधिकार प्राप्त करून देण्यासाठी व त्यांना संरक्षण देण्यासाठी अनेक घटनात्मक कायदे तयार करण्यात आले आहेत. शिक्षणाचे प्रमाण वाढवणे व आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवणे ,आर्थिक व्यवहार व संपत्ती मध्ये सहभाग करून घेणे अशा स्वरूपाचे अनेक उद्दिष्टे महिला महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे आहेत. भारत सरकारने 2001 हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून जाहीर केले आहे. त्यानिमित्ताने महिलांच्या आर्थिक सामाजिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यात आला त्यामध्ये विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांना सकारात्मक कार्य म्हणून वेगवेगळे पुरस्कार देण्यात देण्याची सुरुवात केली. अनेक वर्षे चूल आणि मूल१९७५ हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघाने 'आंतरराष्ट्रीय महिला 'वर्ष म्हणून दरवर्षी साजरा केला साजरा केला जातो. ह्याच्या मागे महिलांचे सक्षमीकरण व्हावे हा एकच हेतू आहे.१९८० च्या दशकात राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली सक्षमीकरणासाठी विविध घटकांच्या माध्यमातून प्रयत्न केले गेले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळामध्ये स्त्रियांना मिळालेले सन्मानाची वागणूक व त्यानंतरच्या काळामध्ये महिलांचा दर्जा हा काही काळ कमी झालेला दिसतो, त्यानंतर राजश्री शाहू महाराज ,महात्मा फुले , सावित्रीबाई फुले ,राजा राम मोहन रॉय, बाबासाहेब आंबेडकर इ. समाजसुधारकाने स्त्री-स्वातंत्र्य आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व समाजामध्ये असणारा त्यांचा असणारा दर्जा सुधारण्यासाठी विविध चळवळीच्या माध्यमातून प्रयत्न केलेले दिसून येतात. या प्रयत्नांना राष्ट्राभिमान स्वातंत्र्य चळवळ आणि सर्वांगीण शिकृषण या गोष्टीची जोड मिळाल्याने मोठ्या प्रमाणात स्त्रियांवरील बंधने अन्याय-अत्याचार दूर होण्यास मदत झाली आहे. अनेक वर्षापासून चूल आणि मूल या कार्यक्षेत्रात अडकलेल्या व माणूस म्हणूनही जगता न येणारी अगतिकता वर्षानुवर्षे भोगणाऱ्या स्त्रीसाठी एक स्वातंत्र्याचे पहाटेच म्हणावी लागेल.

प्राचीन भारतात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते उदाहरणार्थ गार्गी मैत्रेय यांना तर विदुषी म्हणून भर सभेमध्ये मानाची जागा मिळत असे, पण मध्ययुगीन काळामध्ये वाढली आणि सुरक्षित असलेली स्त्री असुरक्षित झाली त्यांच दर्जाही बदलले दिसतं. ब्रिटिश आणि स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री सक्षमीकरणासाठी वेळोवेळी कायदे करण्यात आले.

**शोधनिबंध चा उद्देश :-**

१. महिला सक्षमीकरण ही संकल्पना समजावून घेणे.
२. महिलांच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेणे.
३. महिलांच्या राजकीय स्थितीचा आढावा घेणे.
४. महिलांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.
५. महिलांना त्यांचे अधिकार स्वातंत्र्य व हक्क देणे.

**शोधनिबंधाचे गृहीतकृत्य** :-

१. समाजामध्ये महिलांचे शिक्षणामुळे खूप वेगवेगळया क्षेत्रात सक्षमीकरण होत आहे.

२. राजकारणातील आरक्षणामुळे महिलांचे नेतृत्व गुण उदयास येत आहे.

३. सामाजिक जागृतीमुळे महिलांची सामाजिक स्थिती सुधारले आहे.

४. शैक्षणिक दृष्ट्या महिलांचे स्थान आणि त्यांचा दर्जा हा समाजामध्ये उंचावला आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाची शास्त्रीय संशोधनातील नियमाप्रमाणे तथ्य संकलन करण्यासाठी दुय्यम तथ्य घेण्यात आले आहे.तथ्य संकलन करताना विषयाशी संबंधित संदर्भग्रंथ, मासिके, इंटरनेट ,वर्तमानपत्रातील बातम्या व लेख यांचा आधार घेण्यात आलेला आहे, त्या आधारे संशोधन विषयाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**महिला सक्षमीकरण :-**

सक्षमीकरण एक संकल्पना सक्षमीकरण म्हणजे खूप व्यापक व गुंतागुंतीचे स्वरूप आहे. स्त्रिया हा घटकच मुळात एकसाची नाही येथील बहुविध विविधतेत स्त्रियांचे बहुविविधता समाविष्ट आहे, स्त्रिया बहुविध होण्यासाठी त्यांना समाजात सन्मान प्राप्त होणे महत्त्वाचे आहे. विविध स्तरातील महिलांना आत्मसन्मान अंतर्गत सक्षमीकरण महत्त्वाचे आहे.१९६० च्या दशकात अमेरिकेमध्ये जहाल गटाने सक्षमीकरण ही संकल्पना प्रथम मांडली. १९८० ला महिला कल्याणावर भर दिला गेला,१९९० स्त्री पुरुष समानतेवर भर दिला आणि देशाच्या विकासामध्ये स्त्री-पुरुषांच्या विकासावरच देशाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो.*

**महिला सक्षमीकरणाची संकल्पना :-**

महिला सक्षमीकरण हा आजच्या आधुनिक काळात विशेष चर्चेचा विषय आहे.

आपल्या प्राचीन ग्रंथामध्ये स्त्रियांचे स्थान व महत्त्व लक्षात घेता असे सांगितले आहे की, 'यंत्र नारायस्ततु पुज्यंते रमन्तेय तत्र देवता' म्हणजे जिथे स्त्रियांची पूजा केली जाते तेथे देवता वास करतात, एका स्त्रीमध्ये इतकी शक्ती असूनही तिची विटंबना केली जाते. सक्षमीकरण म्हणजे निर्मितीची शक्ती विकसित आणि परिष्कृत करणे आणि त्याला सामाजिक, आर्थिक ,राजकीय,न्याय,विचार, स्वातंत्र्य,विश्वास,धर्म आणि उपासना व संधीची समानता प्रधान करणे होय.

**दुसऱ्या शब्दात :-** महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांचे सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारणे जेणेकरून त्यांना रोजगार, शिक्षण, आर्थिक प्रगतीसाठी समान संधी उपलब्ध करून देणे, त्यानुसार त्यांना सामाजिक स्वातंत्र्य मिळाले पाहिजे.

**महिलांचे राजकीय स्थिती आणि त्याचे सक्षमीकरण** :-

स्त्रियांच्या स्थितीचा विचार करता राजकीय प्रतिनिधित्व बाबतीत भारताची स्थिती सुधारले आहे, तसेच राजकीय क्षेत्रात लैंगिक समानता येण्यासाठी भारत सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये राजकीय आरक्षण सुरू केले आहे, त्याचा परिणाम म्हणजे गावपातळीपासून देशपातळीपर्यंत सर्व राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढत आहे. त्यांना मिळालेल्या मतदानाच्या हक्कापासून सर्व स्थान भूषवित आहे. जर आपण पाहिले तर महिला राजकीय प्रक्रियेत नुसता सक्रिय नव्हत्या तर,खूप चांगले निर्णय घेतलेले आहेत. खूप पूर्वीपासून जर आपण बघितलं तर आर्यांच्या काळात महत्त्वाचे स्थान होते, त्यानंतर ऋग्वेदात महिला राजकारणात प्रवेश दिसून येतो, त्यानंतर स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर खूप महिलांनी राजकीय क्षेत्रात महत्वाचे पदे भूषवली आहेत उदाहरणार्थ: स्वातंत्र्यपूर्व महिला जिजाबाई भोसले,चांदबीबी,अहिल्यादेवी होळकर, राणी लक्ष्मीबाई इ.

स्वातंत्र्योत्तर : इंदिरा गांधी,ममता बॅनर्जी,सोनिया गांधी, सुषमा स्वराज,जयललिता इ.महिलांनी राजकारणात विविध पदे भूषवून आपला ठसा उमटविला आहे. पंचायत राज्यव्यवस्थेतील जिल्हा परिषद,पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या त्रिस्तरीय रचनेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले दिसते. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात मिळालेल्या राजकीय आरक्षणावरून त्यांचा वाढलेला सहभाग वाढलेला आत्मविश्वास व निर्णय घेण्याची क्षमता या वरून काहीतरी करून दाखवण्याची त्यांची

जिद्द मोठ्या प्रमाणात दिसून येते. स्त्रियांमुळे सर्वसामान्य लोकांचे प्रश्न त्यांच्या ठिकाणी जाऊन सोडवणे शक्य झाले आहे. आपण जर पाहिले तर गेल्या काही दशकांमध्ये शहरांबरोबरच ग्रामीणभागांमध्येही सोयी सुविधा स्वच्छतागृहे,बचतगट,महिलासुरक्षितता, स्त्रीभ्रूण हत्या यासारख्या प्रश्नांवर विशेष लक्ष दिले आहे. ग्रामीण भागातील काही महिला सरपंचांनी केलेले दारूबंदी ची लढाई हि यशस्वीपणे पार पडलेली दिसते. आज महाराष्ट्रात ३४ जिल्हा परिषद,३५१ पंचायत समिती आणि २८००३ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून वंचित दुर्बल मागासलेले व उपेक्षित अशा घटकांना प्रवाहात आणण्याचे काम महिला राजकारणी करत आहेत राज्य शासनाने ५० टक्के आरक्षण महिलांना लागू केले तसेच ७३ व्या घटना दुरुस्ती नंतर स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखून ठेवण्यात आले आहेत, त्यानंतर २४ मार्च २०११ रोजी पंचायत राज्य संस्थेमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे या सर्व आरक्षणामुळे आज महिलांची राजकीय सक्षमीकरण घडून आलेले दिसते.

**महिलांची सामाजिक स्थिती आणि सक्षमीकरण :-**

भारतीय समाज हा पुरुष प्रधान असल्यामुळे स्त्रियांचे समाजातील स्थान हे दुय्यम स्वरूपाचे आहे. समाजातील अनेक रूढी, परंपरा या सर्वांनी स्त्रियांच्या पायात बेड्या अडकले आहेत. त्यातून त्यांचे शोषण सामाजिक विभक्तीकरण आपणास दिसून येते. जर आपण पाहिले तर आत्ताच्या बदललेल्या परिस्थितीत स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा पूर्णपणे बदलून गेलेला दिसतो स्त्रियांना घराबाहेर पडून नोकरी करणे शिक्षण घेणे गैर मानले जायचे पण आजच्या आधुनिक युगात स्त्री या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आपला ठसा उमटवित दिसत आहेत. समाजाच्या विकासात स्त्रियांची महत्त्वाची भूमिका पार पाडतात. महिला हे एक मौल्यवान मानव संसाधन असून देशाच्या शाश्वत विकासासाठी त्याचा सामाजिक व आर्थिक विकास साधने अनिवार्य आहे. ज्या देशाच्या समाजामध्ये स्त्री सुरक्षित असेल तो समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतो.स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांचे समाजातील स्थान वेगवेगळया टप्प्याने बदललेले दिसते त्यासाठी खूप सार्या समाजसुधारकांनी वेगवेगळया मार्गाने त्यांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून दिलेले आहेत.उदाहरणार्थ :- सती प्रथा केशवपन बालविवाह यासारख्या समाजमान्य अनिष्ट रूढी,परंपरा बंद करून स्त्रियांना नवीन वाटा तयार करून दिल्या एकविसाव्या शतकातील स्त्री चळवळ ही स्त्री-पुरुष समानतेच्या पलीकडे जाऊन, स्त्रियांच वैयक्तिक जीवन सत्ता,अधिकार या मुद्द्यावर प्रकाश टाकते. स्त्री चळवळीचा परिणाम आपणास आधुनिक युगात दिसत आहेत रूढी परंपरा प्रत्येक धर्मातील खाजगी जीवन नियंत्रित करणारे

धार्मिक कायदे यांना न जुमानता महिला समाजात स्वतःचं अस्तित्व निर्माण करत आहे

**महिलांचे शैक्षणिक स्थिती आणि सक्षमीकरण :-**

जर आपण पाहिले तर प्राचीन काळापासून असलेली जात तर वर्ण व्यवस्थेमुळे महिलांचा दर्जा हा कमी झालेला दिसतो आणि अधिकार वा हक्कांपासून बाजूला ठेवले. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत गरज म्हणजे शिक्षण होय. देशाची उत्पादकता वाढवण्यासाठी आणि देश सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या मजबूत करण्यासाठी शिक्षणाची भूमिका फार महत्वाचे आहे भारतात मुलींसाठी पहिली शाळा पुण्यात सुरू करण्यात आले महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या युगप्रवर्तक दाम्पत्याने महिला सक्षमीकरणाची वाट खुली करून दिली महिलांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी केंद्र शासन राज्य शासन वेगवेगळया उपाययोजना करत आहेत. शिक्षणाने महिला स्वतः बरोबर कुटुंब व समाज ही जागृत ठेवण्याचं काम करते. आपले कौशल्य व क्षमता ओळखून वेगवेगळया क्षेत्रामध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. त्या आत्मनिर्भर बनून आकाशाला गवसणी घालतान दिसत आहेत. समाजमान्य 'चूल आणि मूल 'ही संकल्पना सोडून शिक्षणाने समाजामध्ये आपली स्वतःची अशी एक महिलांची ओळख निर्माण करून दिली. समाजामध्ये 100% स्त्री साक्षरता झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होणार नाही. अनुसूचित जाती व जमाती मध्ये शिक्षणाचा प्रसार झालेला दिसतो, यावरून स्त्री साक्षरता दर वाढलेला दिसून येतो.

**निष्कर्ष :-**

१. महिलांना राजकीय आरक्षण मिळालेल्या असले तरी त्यांना तरी त्यांना स्त्री-पुरुष असमानतेचे मुळे त्यांचा विकास कमी झालेला दिसतो.

२. सामाजिक दृष्ट्या महिलांचे सक्षमीकरण होत असले तरी एकूण लोकसंख्या मध्ये लिंग गुणोत्तर खूप कमी आहे त्याच्यामागे समाजातील अशिक्षितता मागासलेपण दिसून येते.

३. शिक्षणाच्या दृष्टीने महिलांचे शिक्षणाचे प्रमाण वाढलेले दिसून येत नाही अजूनही काही भागांमध्ये निरक्षरतेचे प्रमाणआहे.

४. आज आपल्या समाजामध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्री खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत असले तरीही तिथे मोठ्या प्रमाणात स्त्री-पुरुष असमानता दिसून येते.

असे अनेक गंभीर प्रश्न सक्षमीकरणासाठी दिसत आहेत.

**शिफारशी व अपेक्षा :-**

१.महिलांचे सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी पाठिंबा दिला पाहिजे.

२. महिलांचे समाजातील हक्क व अधिकार त्यांना मिळाल्यानंतर महिलांची भूमिका व जबाबदारी व्यवस्थित पार पडतील.

३. महिलांना शैक्षणिक दृष्ट्या सक्षम बनवल्यानंतर आपोआप त्या आर्थिक दृष्ट्या ही सक्षम बनतील व स्वतःबरोबर कुटुंब, समाजाचाही विकास घडवून आणतील.

४. महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकारने ज्या कायद्याची तरतूद केले आहे त्याची अंमलबजावणी करावी.

**समारोप :-**

अशाप्रकारे महिला सक्षमीकरण ही महत्त्वाची बाब बनलेली आहे, समाजाने त्यांना दिलेले सर्व हक्क व अधिकार याचा खऱ्या अर्थाने समाजामध्ये पालन होईल त्यावेळेला खऱ्या अर्थाने स्त्री सक्षमीकरण झाले असे म्हणता येईल .या सगळया गोष्टी मध्ये आपल्या सर्वांची जबाबदारी आहे वंचित, मागासलेला दुर्बल अशा सर्व घटकांना त्यांचे अधिकार व हक्क देण्यात यावे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१.चैताली गुरव :- भारतीय समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती.

२. लोकराज्य माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई

३. स्त्रीवादी आणि लोकसाहित्य

४. लोकमत,सकाळ

५. डॉ.शुभांगी गोटे गव्हाणे महिला सबलीकरण स्वरूप स्वरूप व समस्या- वरद पब्लिकेशन औरंगाबाद

# बालकांचा वाढ व विकास

**प्रा. डॉ. अर्चना दयाराम फेंडरकर**
स्व. निर्धनराव पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सानगडी

**सारांश :** दिवसेंदिवस बालविकासशास्त्राचे महत्त्व लोकांना पटू लागले आहे. सामाजिक बदलांमुळे विभक्त कुटुंब पद्धतीमुळे आणि त्याचबरोबर त्यांच्यासमोर असलेल्या असंख्य टीव्ही, कम्प्युटर्स इंटरनेट, मोबाईल यासारख्या आकर्षक साधनांमुळे मुलांना वाढविणे पालकांना कठीण झाले आहे. असंख्य प्रश्न पालकांसमोर उभे राहतात आणि त्यातून बाहेर पडण्याचा धडपड पालक करीत असतात. विकास आणि वाढ या दोन्ही शब्दांमध्ये थोडा भेद आहे. वाढ म्हणजे परिमाणात्मक आणि विकास म्हणजे गुणात्मक असे म्हटले जाते. मुलांची वजन, उंची मोजता येते. मेंदूच्या बाह्य व अंतर्गत रचनेत जो बदल होतो. ती शारीरिक वाढ आहे. शारीरिक वाढ मर्यादित स्वरुपाची असते.

**प्रस्तावना :**

गर्भात सामावल्यापासून मुलांच्या विकासात सुरुवात होते. बालकात सारखे बदल घडत असतात. त्यांच्या शरीरात व आकारात बदल होतात. उंची व वजन वाढत असते. मनात व गतीत बदल होत असतो. हे झालेले बदल केव्हा स्पष्ट दिसतात तर केव्हा हे बदल स्पष्ट दिसत नाही. प्रत्येक अवस्थेत होणारे बदल परिपक्वतेच्या दृष्टीने पालकांना किंवा शिक्षकांना ज्यांचा सतत बालकांची संबंध येतो. अशा व्यक्तींना तरी कमीत कमी विकासाची गती व दिशा माहिती असावयास पाहिजे. मुलांचा विकास कसा होतो? हे माहीत असल्यास मुलांचा विकास योग्य त-हेने होतो आहे किंवा नाही. याची दखल पालकांनी घेता येते व मार्गदर्शन करता येते. परंतु मुलाच्या विकासाचे ज्ञान नसल्यास कित्येकदा मुलांचा नैसर्गिक विकासाचा विचार न करता पालक आपल्या अपेक्षा मुलांवर लागतात. त्यामुळे विकासाला गती मिळण्याऐवजी अडथळा निर्माण होतो.

**उद्दिष्टे (Objective of the Study) :**

१) बालकाच्या, नवजात अवस्था, बाल्यावस्था, शैषवावस्था, उत्तर बाल्यावस्था या अवस्थांचा होणारा परिणाम अभ्यासणे.
२) बालकांच्या वाढ व विकासाच्या कमतरतेचा अभ्यास करणे.
३) बालकांमध्ये होणारे षारीरिक बदल, वाढ, विकास षारीरिक स्वरूपाचा अभ्यास करणे.
४) मुलांमध्ये वाढीव मुलांची उंची, वनज वाढणे यावर अभ्यास करणे.
५) बालकांच्या मेंदूची वाढ, स्मरणषक्तीची वाढ तपासणे.
६) मुलांमध्ये होणारे षारीरिक बदल वाढ या संज्ञेअंतर्गत तर विकास सामाजिक, क्रियात्मक, बौद्धिक व भावनात्मक घटकांचा होणारा परिणामाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना (Hypotheses) :**

१) मुलांना योग्य आहार न मिळाल्यास त्यांच्या वाढीवर व विकासावर अनिष्ट परिणाम होतो.
२) बालविकासात व त्यांच्या वाढीत मुलांच्या गतीमध्ये प्रमाण गंभीर दिसतो.
३) ग्रामीण भागातील प्राथमिक शाळातील मुला-मुलीच्या क्षमतेत फरक नाही.
४) गर्भवती महिलांवर योग्य आहाराच्या कमतरतेमुळे बालकांच्या वाढ व विकासावर परिणाम दिसून येतो.

**वाढ व विकास यांच्यावर परिणाम करणारे घटक :**

**१) बुद्धीमत्ता :** विकासावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक म्हणजे बुद्धिमत्ता, तीव्र बुद्धिमत्ता प्राप्त झालेल्या मुलांचा विकास द्रुत गतीने आणि सर्वांगीण स्वरूपाची स्वरूपाचा आढळून येतो. याच्या उलट मंदबुद्धीच्या बालकांच्या विकासात विलंबित आणि मागासलेला आढळून येतो.

**२) परिस्थिती आणि अनुवांशिकता :** सर्वसाधारण मुले एकाच चाकोरीतून वाढत असतात. विकासाचे प्रमाण दाखवीत असतात.

पण काही मुलांचा जास्त वेगाने तर काही मुलांचा अतिशय मंद गतीने विकास होत असल्याचेही आपल्याला दिसून येते. प्रत्येक बालकाच्या विकासाचे टप्पे आणि क्रम जरी एकसारखा असला तरी प्रत्येक मुलांचा विकास स्वतंत्रपणे होत असतो. एकाचा विकास दुस-याच्या विकासाषी तसाच मिळता-जुळता राहत नाही. कारण प्रत्येकाची परिस्थिती व अनुवांशिकता भिन्न-भिन्न असते. शारीरिक वाढीवर आहार, शरीर स्वास्थ्य, हवामान, स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण, अनुवांशिकता इत्यादी घटकांचा परिणाम होत असतो.

**३) लिंग :**

लिंगाचा मुलांच्या विकासावर थोडाफार परिणाम होतो. जसे, किशोर वयापर्यंत मुलींचा शारीरिक व मानसिक विकास खूप वेगाने होतो. त्यामानाने या वयात मुलांमध्ये एवढी तीव्रता नसते.

**४) अंतःस्त्रावी ग्रंथी :**

बालकांची शारीरिक आणि मानसिक विकास अंतःस्त्रावी ग्रंथीवर अवलंबून असतो. या ग्रंथीचा परिणाम गर्भावस्थेपासूनच होत असतो. ग्रंथीचा स्त्राव कमी किंवा जास्त झाल्यास शारीरिक वाढ अमर्याद होते आणि स्त्राव कमी झाल्यास व्यक्ती खुरटलेल्यासारखे दिसते. वयात आल्यावर पुरुषांमध्ये व स्त्रियांमध्ये आढळून येणारा बदल ह्याच स्त्रावामुळे होतो.

**५) अपरिपक्वता :**

मुलाचा जन्माचा काळ साधारण नऊ महिने नऊ दिवस मानला जातो. परंतु तत्पूर्वी बालक जन्माला आल्यास त्याची वाढ अपुरी होते. यालाच आपण अपरिपक्व बालक असे म्हणतो. अशी मुले वजनाने कमी असतात. अशा मुलांकडे विशिष्ट प्रकारे लक्ष पुरवावयास हवे, अन्यथा ह्यांच्या शारीरिक आणि कारक विकासावर अनिष्ट परिणाम होतो. अशा बालकांचा विकास इतरांच्या तुलनेने मागासलेला आढळतो. परंतु त्यांची दिनचर्या, आहार इतर गरजा ह्याची योग्य त-हेने दखल घेतल्यास अपरिपक्व मुलांची योग्य वाढ होऊन ते सर्वसामान्य मुलांप्रमाणे वाढू शकते.

**६) आजार :**

काही मुले जन्मतःच अशक्त असतात. आईची प्रकृती योग्य नसल्यास अथवा आईचा असंतुलित आहार असल्यास मुलांच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो. त्यांच्यामध्ये रोगप्रतिकार शक्तीचा प्रादुर्भाव दिसतो. अशा मुलांवर बाहेरच्या वातावरणाचा परिणाम होतो व ती रोगांना लवकर बळी पडतात.

**७) शारीरिक दोष :**

काही बालकांमध्ये जन्मतःच दोष असतात. तर काहीमध्ये एखाद्या भयंकर आजारामुळे, अपघातामुळे दोष निर्माण होतात. पोलिओमुळे बालकांचे पाय अधू होतात. अशा मुलांच्या केवळ शारीरिक विकासावरच नव्हे तर सामाजिक, भावनात्मक किंवा कारक विकासावर अनिष्ट परिणाम होतो. अशी मुले कधी-कधी पूर्णतः परावलंबी होतात किंवा निवडून भावना निर्माण होऊन ते निराश होतात. ते स्वतःला असुरक्षित समजतात. म्हणून शारीरिक असलेल्या मुलांकडे विशेष लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

**८) कुटुंब, समाज, संस्कृती :**

हे तिन्ही घटक बालकांच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावित असतात. कुटुंबाच्या आर्थिक स्तरानुसार बालकांचा विकास होत असतो. बालकांचा आर्थिक दर्जा निम्न असेल त्याचा बालकांच्या शारीरिक व मानसिक विकासावर परिणाम होतो. घरातील वातावरणाचाही मुलांच्या विकासावर चांगला किंवा वाईट परिणाम होऊ शकतो. कुटुंबाप्रमाणेच ज्या समाजात मूल वाढते, त्याचाही परिणाम मुलांच्या विकासावर होत असतो. प्रगत समाजातील बालकांचा विकास उच्च दर्जाचा असतो.

**विकासाच्या अवस्था (Stages of Development) :**

जन्मापासूनच नव्हे तर जन्मपूर्व अवस्थेपासून मृत्युपूर्व व्यक्तीचा विकास होत असतो. प्रत्येक व्यक्तीनुसार त्यामध्ये भिन्नता आढळते, पण तरीही काही विशिष्ट अवस्थांमध्ये आढळून येतात व त्यानुसार उपवस्था केल्या जातात.

विकासाच्या अवस्था पुढीलप्रमाणे -

१) जन्मपूर्व अवस्था (Pre-natnel Stage) - गर्भधारणेपासून जन्मापर्यंत

२) नवजात अवस्था (Neo-nate Stage) - जन्मापासून २ आठवड्यापर्यंत
३) बाल्यावस्था (Babyhood) - २ आठवड्यापासून २ वर्षापर्यंत
४) शैशवावस्था (Infancy) - २ ते ६ वर्षापर्यंत
५) उत्तर बाल्यावस्था (Early Childhood) - ६ ते ११ ते १२ वर्षापर्यंत
६) पौगडावस्था (Puberty, Pubsence) - १२ ते १४ वर्षापासून १३ ते १५ वर्षापर्यंत
७) किशोरावस्था (Adolescence) - १३ ते १४ वर्षापर्यंत २० ते २१ वर्षापर्यंत
८) तारुण्यावस्था (Youth or early Adulthood) - २१ ते ४० वर्षापर्यंत
९) प्रौढावस्था (Adulthood) - ४० ते ६० वर्षापर्यंत
१०) वृद्धावस्था (Old Age) - ६० वर्षापासून मृत्यूपर्यंत

नक्षलवादाविरूद्ध लक्षण्यासाठी देश एक झाला पाहिजे. केवळ दूरचित्रवाणीवरून घोषणा करून नक्षलवादाशी लढता येणार नाही. नक्षलवाद्यांची लष्करी व्यवस्था त्यांना मारूनच विस्कळीत केली पाहिजे. राजकीय पक्ष, पोलीस दलाने एकत्र येऊन नक्षलवाद संपविण्यासाठी एक कार्यक्रम तयार करावा. पोलीस दलाचे आधुनिकीकरण केले पाहिजे. आदिवासींना मदत करणारे कायदे हवेत. राज्यकारभार चांगला हवा व सामान्य नागरीकांनी पोलिसांचे कान व डोळे बनायला हवेत या सर्व गोष्टी असतील तर आपण नक्षलवाद संपवण्यामध्ये यश मिळवू शकू. तरच भारतातील लोकशाही जीवंत आहे असे म्हणता येईल. लोकशाही टिकवून ठेवता येईल.व लोकशाही समोर जे अव्हान निर्मान झाले आहे त्या आव्हानाचा मुकाबला एकतेने करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सुची :**

1. नक्षलवाद : उद्‌भव और विकास - लालेन्द्र कुमार कुंदन.
2. डॉ.जोशी सुधाकर - भारतीय शासन आणि राजकारन
3. नक्षलवाद की चुनोतियाँ - डॉ. वीरिंद्र सिंह बघेल.
4. बस्तरचे माओवादी - राहुल पंडिता, अनुवाद : चिन्मय दामले.
5. नक्षलवादाचे आव्हान - देवेंद्र गावंडे.
6. नक्षलवादी आणि आदिवासी - डॉ. गोविंद गारे.
7. सावध ऐका... चीन पाकिस्तान युती : एक आव्हाण - विशाखा पाटील, राजहंस
8. प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे - ४११ ०३०

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, March 2022, Volume-13, Issue-11

# भारतातील ऑनलाइन शिक्षण प्रणालीमुळे निर्माण झालेली ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणासमोरील

**श्री. संजय कुमार पाटील**

BSc, BEd, M.A. ENGLISH, MBA, MEd, NET, Headmaster Kendriya Vidyalaya No.1,Afs, Lohegaon,Pune

**आव्हाने :**

जगभरामध्ये विकसित राष्ट्रांची संख्या ही विकसनशील किंवा अविकसित राष्ट्रांच्या तुलनेने आपणास फार कमी दिसून येते. या बाबींच गांभीर्याने विचार केला असता आपणास असे दिसून येते की ज्या राष्ट्राने उत्तम दर्जाचे शिक्षण दिले आहे ती राष्ट्रे विकासित राष्ट्रे म्हणून ओळखली जातात.याचा अर्थ असा नाही की विकसनशील किंवा अविकसित राष्ट्रांना शिक्षणाचे महत्त्व समजलेले नाही तर त्यासाठी तेथील भौगोलिक,राजकीय,आर्थिक, सामाजिक, धार्मिक इत्यादी व यासारख्या अनेक घटकांमुळे शिक्षणाचा पाहिजे तेवढा प्रचार-प्रसार व स्वीकार त्या-त्या राष्ट्रांमध्ये झालेला नाही. विकसित राष्ट्रांचा शिक्षण विषयक दृष्टिकोन तपासणे व त्यांचा संशोधनवृत्तीने अभ्यास करणे काळाची गरज आहे. भारतामध्ये शिक्षणाची मोठी परंपरा आहे. भारतीय शिक्षण पद्धतीचा अभ्यास जगभरातील शिक्षणतज्ज्ञांनी केला. ते एवढ्यावरच न थांबता प्रत्यक्ष भारतामध्ये येऊन भारतीय शिक्षण पद्धतीवर संशोधन करण्याचे काम या जगविख्यात शिक्षणतज्ज्ञांनी केलेले आहे.यावरून असे लक्षात येते की भारतीय शिक्षण पद्धती किंवा भारतातील शिक्षण हे प्राचीन काळी किती उत्कृष्ट दर्जाचे होते. भारतीय शिक्षणाच्या स्थितीचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, भारतातील शिक्षण हे प्राचीन भारतीय शिक्षण, मध्ययुगीन भारतीय शिक्षण आणि आधुनिक भारतीय शिक्षण या भागात विभागलेले दिसून येते. त्या-त्या वेळेनुसार,काळानुसार भारतीय शिक्षणामध्ये बदल झालेला दिसून येतो. आजच्या काळातील शिक्षणाचा विचार करण्याअगोदर मागे चालत आलेले शिक्षण याचा याठिकाणी थोडक्यात आढावा घेणे गरजेचे वाटते. प्राचीन भारतीय शिक्षणाने जी गुरु-शिष्याची फार मोठी परंपरा दिलेली आहे. ती आजतागायत सुरूच आहे. निसर्गाच्या सानिध्यातील शिक्षण, अनुभव शिक्षण, कौशल्यावर आधारित शिक्षण हे प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीची मोठी देण आहे. प्राचीन काळी गुरुकुल,तक्षशिलेसारखी विद्यापीठे, गुरुगृही शिक्षण ही शिक्षण पद्धती दिसून येते, मध्ययुगीन भारतीय शिक्षणामध्ये बराच बदल झाला. यावेळी सर्वांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम झाले. धार्मिक शिक्षणाला जास्त महत्त्व येऊ लागले. शैक्षणिक संस्था व विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली. त्यानंतर आधुनिक भारतीय शिक्षण पद्धतीचा उदय झाला. यामध्ये सहा भाग दिले ज्यामध्ये भारतीय आधुनिक शिक्षण पद्धती काम करीत होती. यामध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक, विद्यालयीन (सेकंडरी), जुनियर कॉलेज(हायर सेकंडरी), पदवी आणि पदव्युत्तर होय. भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये बदल होताना दिसत आहेत. याला शास्त्रीयदृष्ट्या शिक्षण क्षेत्रामध्ये होणारी

शैक्षणिक क्रांतीच म्हणावी लागेल. वर सांगितल्याप्रमाणे प्राचीन शिक्षण पद्धती आणि आताची एकविसाव्या शतकातील शिक्षण पद्धती यात खूप तफावत दिसते. भारतामधील नवी पिढी आता मोठ्या प्रमाणात शिक्षण घेताना दिसत आहे, त्यामुळेच शिक्षण क्षेत्रात नवनवीन शोध पाहावयास मिळतात. पाटी-लेखन ची जागा मोबाइल, लॅपटॉप, कम्प्युटर यासारख्या इलेक्ट्रॉनिक साधनांनी घेतली आहे. आता पूर्वीसारखे कम्प्युटरचे ज्ञान देण्याचे काम राहिलेले नाही. विद्यार्थी सभोवतालच्या परिसरातूनच सहजच संगणकाचे ज्ञान घेताना दिसतात.

संगणक, लॅपटॉप, मोबाइल यासारख्या इलेक्ट्रॉनिक्स साधनांचा वापर करून अध्ययन व अध्यापन प्रक्रिया सुलभ, सोपी व प्रभावी झालेली आहे एकविसाव्या शतकातील विज्ञानाची प्रगती ही मानवी विकासात कारणीभूत ठरत आहे.व या विकासामध्ये शिक्षणाची भूमिका मुख्य आहे. आज covid-19 च्या प्रादुर्भावामुळे सर्व क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे. त्यामध्ये शिक्षण क्षेत्र कसे सुटणार. या covid-19 मुळे संपूर्ण जग जीवन थांबून गेले होते. शिक्षण प्रक्रिया सुद्धा थांबली होती. या थांबलेल्या प्रक्रियेला सुरू करण्यासाठी ऑनलाइन शिक्षण पद्धती नव्याने आपल्या भारतामध्ये उदयास आली. ऑनलाईन शिक्षण पद्धतीमुळे थांबलेले शिक्षण पुन्हा सुरू झाले परंतु ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा वापर सुरू झाला त्यामध्ये सर्वच विद्यार्थी सहभागी झाले का? covid-19 च्या काळात फार मोठे स्थलांतर झाले त्यामुळे शिक्षक या स्थलांतरित विद्यार्थी-पालकांपर्यंत ऑनलाइनच्या माध्यमातून पोहोचला का? ऑनलाईन शिक्षण पद्धती शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रभावी ठरली काय? इत्यादी व यासारखे अनेक प्रश्न उपस्थित झाले. त्यापैकी भारतामध्ये ऑनलाइन शिक्षण प्रणालीमुळे निर्माण झालेली ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणासमोरील आव्हानाचा विचार करणे या ठिकाणी जास्त महत्वाचे वाटते. त्याचे कारण असे की प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा पाया आहे आणि जर पायाच मजबूत नसेल तर पुढील बाबी आपोआपच कमजोर होत जातात. भारतामध्ये जास्तीत जास्त समुदाय हा खेड्यापाड्यात, वस्त्या, डोंगरभाग यांमध्ये वसलेला आहे. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भाग हा विकासाच्या बाबतीत कमी असल्याचे दिसून येते. याचा अर्थ असा की सर्वच बाबतीत ग्रामीण भाग शहरी पेक्षा सोयीसुविधांच्या तुलनेत कमी आहे. मग यामध्ये शिक्षणाचा पण अंतर्भाव होतो. covid-19 च्या काळात नव्याने भारतात उदयास आलेली ऑनलाइन शिक्षण प्रणाली ग्रामीण भागामध्ये एवढ्या वेगाने पसरली गेली नाही व त्याद्वारे हवे तसे शिकवले गेले नाही.

उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन मध्ये शिकणारे विद्यार्थी व प्राथमिक शाळेतील विद्यार्थी यामध्ये खूप तफावत दिसून येते. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिक्षण पद्धतीची सुरुवात करण्याअगोदर प्रत्यक्ष प्राथमिक शाळांना भेटी देऊन तेथील इंटरनेटचा आढावा घेऊन ग्रामीण भाग असेल तर पालकांशी संपर्क साधून सरकारने प्राथमिक शाळांसाठी ऑनलाइन शिक्षण पद्धती राबविण्याच्या बाबतीत पाहिजे तेवढा आढावा घेतलेला दिसून येत नाही. प्राथमिक शिक्षणाचे दोन भाग करुन ऑनलाईन शिक्षण प्रणालीची ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षण समोरील आव्हाने व शहरी भागातील

प्राथमिक शिक्षण समोरील आव्हाने अशा दोन भागात प्राथमिक शिक्षणाची विभागणी केली तर दोन्ही भागातील आव्हानावरील उपाययोजनेपर्यंत पोहोचणे शक्य होईल.

त्यापैकी ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणापुढील आव्हाने याचा आढावा घेण्याचा प्रयत्न पुढे केला आहे :

**प्रास्ताविक :**

ग्रामीण भाग हा पूर्वीपासून मागासलेला समजला जातो:परंतु एकविसाव्या शतकामध्ये ग्रामीण भागाची फार मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली पाहिलेली आहे. ग्रामीण भागामध्ये विकासाचे एकमेव कारण म्हणजे शिक्षण होय. शिक्षणामुळे ग्रामीण भागातील अज्ञान,अंधश्रद्धा,रूढी-परंपरा, धार्मिक भेद संपुष्टात येताना दिसत आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहोचावे यासाठी सरकार सतत प्रयत्नशील आहे. याची जर पावती बघितली तर असे दिसून येईल की ग्रामीण भागातील विद्यार्थी आज भारताच्या उच्च पदावर नोकरी करीत आहे. तो वैज्ञानिक,वकील, खेळाडू,राजकीय क्षेत्रात अशा व इतर अनेक क्षेत्रात त्याने कमालीची मजल मारली. असे सगळे असले तरी ग्रामीण भागात शिक्षणाच्या दृष्टीने परिपूर्ण आहे का? तर याचे उत्तर नक्कीच नाही असे आहे आणि उदाहरण द्यायचे झाले तर ग्रामीण भागात वैद्यकीय महाविद्यालय किंवा इंजिनिअरिंग महाविद्यालयची सुविधा आहे का? तर असे उत्तर नाही असे मिळते.

विज्ञानाने कितीही प्रगती साधली पण ग्रामीण भागांमध्ये विकासाचा मंद गतीने सुरू आहे. अशातच covid-19 आला व अनेक समस्यांना आव्हानांना ग्रामीण भागाला सामोरे जावे लागले आहे. यापैकी एक आव्हान हे ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणसमोरील आहे. याचा आढावा पाहिजे तेवढा सरकार किंवा इतर सामाजिक संस्था किंवा राज्य सरकारने घेतलेला दिसून येत नाही.

1. ग्रामीण भागामध्ये प्राथमिक शाळा हा पूर्णपणे डिजिटल नाही.ऑनलाईन ही संकल्पना नवी असल्याकारणाने प्राथमिक शाळांना इंटरनेट,ऑनलाईनशी संबंधित साधने यांची ओळख अगोदर करून देणे फार महत्त्वाचे होते परंतु तसे काहीच झाले नाही. प्राथमिक शाळांना संगणक वा इतर तंत्रज्ञान शाळेपर्यंत पोहोचवणे व त्यांना त्याची माहिती देणे यापैकी एकही कार्य सर्व ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेपर्यंत झालेले दिसून येत नाही. अशातच संगणक,मोबाईल,लॅपटॉप व इतर तंत्रज्ञान प्राथमिक शाळांना उपलब्ध होण्याचे सर्वप्रथम आव्हान होते किंवा आहे असे म्हणल्यास काही वेगळे ठरणार नाही.

2. ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षकांना संगणक,लॅपटॉप इत्यादी व यासारख्या इतर इलेक्ट्रॉनिक साधनांची माहिती आहे परंतु ऑनलाइन शिक्षण पद्धतीसाठी त्यांना प्रत्येक ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण दिले गेले नाही असे दिसून येते. त्यामुळे ऑनलाइन शिक्षण शिकविण्यासाठी प्रशिक्षण नसल्यामुळे ऑनलाइन शिक्षण कसे शिकवावे? हे प्राथमिक शाळेतील शिक्षांसामोरील आव्हान उपस्थित झाल्याचे दिसून येते.सरकारने शिक्षण व प्रशिक्षणामध्ये संगणकाचा वापर करायला सांगितले आहे.शिक्षण व प्रशिक्षणाच्या संदर्भात ब्रिजमोहन दायमा एका ठिकाणी लिहितात, “शिक्षणासाठी इंटरनेट ,वेबसाईटच्या वापरातून शिक्षण घेता येते.काही अभ्यासक्रमाच्या परीक्षासुद्धा देता येतात. प्रत्येक

शिक्षकाने अध्यापनामध्ये संगणकाचा वापर योग्य प्रकारे करण्यासाठी या क्षेत्राचे ज्ञान घेतले पाहिजे म्हणून महाराष्ट्र शासनाने 'शिक्षकांसाठी माहिती तंत्रज्ञान' हा अभ्यासक्रम सुरु केला."[1] परंतु सरकार खरच प्रशिक्षण घेण्यास यशस्वी ठरल आहे का? जर खरच यशस्वी ठरलं असते तर प्राथमिक शिक्षकांना ऑनलाइन शिकवण्यामध्ये अडचणी आल्या नसत्या.

3. ग्रामीण भागांमध्ये प्राथमिक शिक्षण पोहोचले तरी पूर्णपणे शंभर टक्के साक्षर मिळणार नाही.पालकवर्गमोठ्या प्रमाणात अशिक्षित असल्याचे आपणास दिसून येते. पालकवर्ग अशिक्षित असल्याने आणखी मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये अशिक्षित पालक जास्तीत जास्त आर्थिक दृष्ट्या कमकुवत आहेत. पालकांनातंत्रज्ञानाचा वापर करता येत नाही.यामधून प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वरील बाबींचा फार मोठा फटका बसल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येते. पालक आर्थिकदृष्ट्या गरीब असल्यामुळे ऑनलाइन शिक्षणासाठी मोबाईल, कम्प्युटर, लॅपटॉप शिक्षणासाठीची उपयुक्त साधने विकत घेऊ शकला नाही. परिणामी मुले ऑनलाइन शिक्षण घेऊ शकले नाही आणि हे ऑनलाइन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व पालक यांच्या पुढील सर्वात महत्त्वाचे व ठळकपणे दिसणारे आव्हान आहे आणि या आव्हानांना सामोरे जाणे ग्रामीण भागातील पालकांना सोपी बाब नाही. अशातच सरकारने यावर उपाययोजना केलेली दिसून येत नाही. विश्वास पाटील एका ठिकाणी म्हणतात, "नागरिकांना जे शिक्षण देण्यात येते,त्या शिक्षणाच्या ढाच्यावर राष्ट्राचे भवितव्य ठरते.हे शिक्षण नागरिकांना खऱ्या अर्थाने प्रौढ आणि कार्यकुशल बनविते कि मुळातल्यापेक्षा अधिक अप्रबुध्द, अविवेकी,बेजबाबदार बनविते-हे शिक्षणाच्या दर्जावर ठरते .मुळात निर्विकार व तटस्थ असणारे नागरिकाचे राजकीय मानस चुकीच्या शिक्षणपद्धतीमुळे कसे एकांगी आणि विध्वंसक व हिंसक राजकीय कार्यक्रमांकडे आकृष्ट होऊ लागते".[2] याचा सरळ अर्थ आहे कि सरकार दर्जेदार शिक्षणासाठी नेहमी प्रयत्नशील असायला हवे.मग कोविड-19 सारखी परिस्थिती आली तरी सरकारने त्यावर उपाययोजना करणे अपेक्षित असते .परंतु असे काही झालेले दुसून येत नाही.

4. ग्रामीण भागातील पालक साक्षर नसल्याने व विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेणारा असल्याने त्याचे वय कमी व त्याला तंत्रज्ञान हाताळण्याचे कौशल्य नसल्याने ऑनलाइन शिक्षण घेण्यासाठी जर संगणक, मोबाईल, लॅपटॉप या वस्तू घेतल्या तरी त्याचा वापर विद्यार्थी-पालक दोघांनाही कसा करायचा हे मोठे आव्हानाचे काम होते. यासाठी कुठलीही योजना व उपक्रम ग्रामीण भागांमध्ये राबविला गेला नाही. म्हणजेच सरकार ऑनलाईन शिक्षण ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यापर्यंत पुरविण्याच्या बाबतीत कुठेतरी मागे पडल्याचे दिसून येते.

5. आज विज्ञानाच्या सहय्याने मनुष्य अंतराळात, दुसऱ्या ग्रहावर जाऊन आला हे जरी खरे असले तरी ग्रामीण भागात इंटरनेट सगळया ठिकाणी पोहचल्याचे दिसून येत नाही. संगणक, लॅपटॉप, मोबाईल घेऊन काहीच फायदा होणार होणार नाही; कारण त्याला चालविण्यासाठी आवश्यक असणारे इंटरनेट उपलब्ध नाही. प्राथमिक शिक्षण घेणारे विद्यार्थी इंटरनेटच्या शोधात घराच्या बाहेर दूरवर जाऊ शकत नाही. त्यामुळे ऑनलाईनसाठी सर्वात

महत्त्वाचे म्हणजे इंटरनेट सेवा तीच नसेल तर ऑनलाइन शिक्षण कसे घेतले जाईल. हे एक आव्हान ऑनलाइन शिक्षण प्रणालीमध्ये प्राथमिक शिक्षणासमोर डोके वर काढून उभे असल्याचे चित्र दिसून येते.

वरील आव्हाने ही ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणामध्ये ऑनलाइन शिक्षण प्रणालीचा संदर्भात असल्याचे आपणास दिसून येतात.

संदर्भ :

1.दायमाब्रिजमोहन,सेट/नेट मार्गदर्शक,विद्याभारती प्रकाशन, गुजराती शाळेसमोर ,मेन रोड ,लातूर,पृ. 482 व 483.

2.पाटील विश्वास, झुंडीचे मनासशास्त्र,साधना प्रकाशन,431 शनिवार पेठ, पुणे,पृ.81.

# महिला बचत गट : स्थापना, कार्ये आणि फायदे

**प्रा. निलेश सर्जेराव साळवे[1]   डॉ. गोपीनाथ साहेबराव बोत्रे[2]**

1पिएच.डी संशोधक विद्यार्थी, पिएच.डी संशोधन केंद्र – श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे

2पिएच.डी मार्गदर्शक समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय, लोणी काळभोर

**गोषवारा :**महिला बचत गट ही संकल्पना गरीब, गरजू, कष्टकरी महिलांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. आजही भारतातील २७.५ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आपले जीवन व्यथीत करीत आहे. असे असताना अशा महिलांना यातून बाहेर येण्यासाठी आर्थिक मदतीची नितांत गरज असते. असे असले तरी संघटित क्षेत्रातील कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था या लोकांना कर्ज देण्यास तयार नसतात. त्यामुळे या महिला बचत गटाच्या माध्यमातून एकत्र येऊन स्वतःचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणतात. या महिलांच्या प्रगतीमध्ये बचत गटाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सदर महिला बचत गोळा करून एक मोठी रक्कम जमा करतात व त्या रकमेचा वापर सदस्य महिलांना कर्ज देण्यासाठी करतात. या मिळालेल्या कर्जातून या महिला आपल्या आर्थिक व व्यावसायिक गरजा पूर्ण करतात व आपल्या प्रगतीचा मार्ग खुला करतात. सदर संशोधनपर लेखामध्ये अभ्यासकाने महिला बचत गट ही संकल्पना काय आहे, महिला बचत गटाची स्थापना, कार्य आणि फायदे यावर प्रकाश टाकला आहे.

प्रमुख शब्द : महिला बचत गट, महिला सबलीकरण, आर्थिक व सामाजिक विकास

**प्रस्तावना :**

भारतातील ७० टक्केपेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण भागामध्ये वास्तव्यास आहे. आजही २७.५ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आपले जीवन व्यतीत करत असलेले दिसून येते. समाजातील अशाच गरीब गरीब कष्टकरी जनतेच्या मदतीसाठी, त्यांना अर्थसाहाय्य करण्यासाठी कोणत्याही प्रकारची बँक पुढे येताना दिसत नाही. कारण त्यांच्याकडे बँकेला देण्यासाठी तारण नसते. योग्य ती कागदपत्रे उपलब्ध नसतात. अशावेळी बचत गट ही संकल्पना महत्त्वाची ठरते. कारण बचतगटामार्फत सदस्य महिलांना विनातारण, विना कागदपत्र कर्ज उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे अशा महिला बचत गटांच्या मदतीने आपली आर्थिक व सामाजिक उन्नती घडवून आणू शकतात.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

'महिला बचत गट : स्थापना, कार्ये आणि फायदे' या विषयातील संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

'महिला बचत गट' हि संकल्पना समजून घेणे.

महिला बचत गटाचा स्थापना कशी करतात हे जाणून घेणे.

महिला बचत गटाच्या कार्यांची माहिती घेणे.

महिला बचत गटात सहभागी झाल्याने होणारे फायदे जाणून घेणे.

**संशोधनाची गृहीतके :**

'महिला बचत गट : स्थापना, कार्ये आणि फायदे' या विषयात संशोधन करत असताना पुढील गृहीतके विचारात घेण्यात आली आहेत.

1. महिला बचत गटामार्फत सदस्य महिलांना कर्ज वाटप केले जाते.
2. महिला बचत गटाच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचा लाभ घेता येतो.

**संशोधन पद्धती :**

'महिला बचत गट : स्थापना, कार्ये आणि फायदे' या विषयात संशोधन करत असताना ग्रंथालय संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये संशोधनासाठी आवश्यक माहितीचे संकलन करण्याकरिता पुस्तके, वृतपत्र, शोधनिबंध व विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शासकीय अहवाल यांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा :**

सदर विषयात संशोधन करताना फक्त 'महिला बचत गट' हि संकल्पना विचारत घेण्यात आली आहे. तसेच बचत गटांची स्थापना, कार्ये आणि फायदे या घटकांच्या अभ्यासापुरतेच सदर संशोधन मर्यादित आहे.

**महिला बचत गट संकल्पना :**

बचत गटाची चळवळ समाजामध्ये आर्थिक सुबत्ता आणणे असली तरी महिलांच्या आर्थिक, सामाजिक व आरोग्यवर्धक सबलीकरण करण्यासाठी महिला बचत गटांची भूमिका महत्वाची मानली जाते. महिलांना बचतीची सवय लाऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ घडून आणण्यासाठी महिला बचत गटांमार्फत सतत प्रयत्न केले जातात. महिला बचत गटाची व्याख्या करणे अवघड असले तरी ती पुढील प्रमाणे सांगता येईल. महिला बचत गट म्हणजे "प्रादेशिक समानता असलेल्या समविचारी, समान गरजा, समान अपेक्षा असलेल्या १० ते २० महिलांनी स्वल्पबचत करून बचतीचा विनियोग उपभोगासाठी करून कर्ज घेऊन, करणाऱ्या व लोकशाही

मार्गाने संघटन करणाऱ्या समूहास स्वयंसहाय्यता बचत गट असे म्हणतात." "परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे जाण्यासाठी स्वेच्छेने, संमतीने, सामुहिकपणे बचतीच्या निमित्ताने केलेली वाटचाल म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट होय."

महिला बचत गटातील सर्व महिलांच्या समान गरजा असतात. समान गरजा असल्यामुळे या महिला एकत्र येऊन समान उद्दिष्टासाठी काम करू शकतात. या महिला समान आर्थिक व सामाजिक स्थितीतील असतात. तसेच त्या एकाच ठिकाणच्या, वाडी वस्तीवरील असतात. सदर बचत गटामध्ये लोकशाही पद्धतीने कामकाज चालते. सर्व महिला एकत्रित सर्वानुमते निर्णय घेतात. बचत गोळा करणे, कर्ज उपलब्ध करून देणे यासारखे सर्व आर्थिक व्यवहार रोखीने केले जातात. अशा बचत गटांमध्ये कमीत कमी ५ व जास्तीत जास्त २० सभासद असतात.

**महिला बचत गटाची स्थापना :**

महिला बचत गट स्थापन करताना आणि टप्प्यांमधून जावे लागते. नवीन बचत गटाची सुरुवात करणे जास्त अवघड नाही. परंतु हा गट पुढे निरंतर चालू ठेवणे मात्र अवघड असते.बचत गट स्थापन करण्याची प्रक्रिया सोपी आहे परंतु वेळखाऊ आहे. एका दमात बचत गट स्थापन करता येत नाही. चत गट स्थापन करण्याच्या पुढील पायऱ्या आहेत.

**प्रेरणा :** बचत गटात सामील होण्यासाठी महिलांना प्रेरित करणे हि बचत गट स्थापनेची पहिली आणि महत्त्वाची पायरी होय. बचत गट स्थापनेच्या वेळी अनेक महिलांना ही कल्पना सांगितली जाते तेव्हा त्यापैकी काही महिला बचत गटात सदस्य होण्याकरीता तयार होतात तर काही महिला नकार देतात. अशा महिलांना एकत्र करून त्यांच्या शंकांचे निरसन करणे, बचत गट काय आहे, तो कसा फायदेशीर आहे याविषयी सविस्तर माहिती देऊन अशा महिलांना बचत गटामध्ये सामील होण्यासाठी प्रेरित केले जाते.

**बचत गटाची स्थापना :** बचत गट स्थापन करण्यासाठी सर्वप्रथम एकाच गावातील, वाडी वस्ती मधील समान आर्थिक व सामाजिक परिस्थिती दहा ते वीस महिला एकत्र करून त्यांना बचत गटाची कल्पना, नियम, अटी,कामकाज इत्यादी व्यवस्थित समजावून सांगून बचत गटाची स्थापना केली जाते.

गटाला नाव देणे : बचत गटाची स्थापना झाल्यानंतर नव्याने स्थापन झालेला गट कोणत्या नावाने ओळखला जाईल हे ठरवायचे. म्हणजेच गटाला नाव द्यायचे. गटाला नाव दिल्यानंतर पुढे त्याच नावाने गटाचे सर्व व्यवहार केले जातात.

**गटाच्या पदाधिकाऱ्यांची निवड :** बचत गटाला नाव दिल्यानंतर गटाचा कारभार व्यवस्थित चालविण्यासाठी विविध पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. सर्वसाधारणपणे बचत गटांमध्ये अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार किंवा कोषाध्यक्ष अशी तीन पदे असतात. या पदांवर सर्व सदस्यांच्या सहमतीने काही सदस्यांची निवड केली जाते. काही बचत गटामध्ये उपाध्यक्ष हे पद देखील असते. या पदाधिकाऱ्यांची निवड विशिष्ट कालावधीसाठी केली जाते या कालावधीनंतर नवीन पदाधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते किंवा जुन्याच पदाधिकाऱ्यांची पुनर नेमणूक केली जाते.

**गटाचे बँकेत खाते उघडणे :** बचत गटाला जे नाव देण्यात आले आहे, त्याच नावाने बँकेत गटाचे खाते उघडले जाते. असे खाते उघडताना ते शक्यतो राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेत उघडले जाते. गटाचे खाते उघडताना सर्व पदाधिकाऱ्यांच्या व सर्व सदस्यांच्या सहीने खाते उघडले जाते. बँकेत खाते उघडताना सुरुवातीला काही रक्कम बँकेत जमा करावी लागते. खाते उघडण्यासाठी बचत गटाच्या नावाचा व पदाधिकाऱ्यांचा शिक्का आवश्यक असतो. तो आधीच बनवून द्यावा लागतो अशा प्रकारे बचत गटाच्या नावाने बँकेत खाते उघडल्यानंतर बचत गट स्थापन झाला असे मानले जाते व गटाचा पुढील कारभार सुरू होतो.अनेकदा बचत गटाची स्थापना करताना काही सदस्य एकत्र येतात व सुरुवातीची सहा महिने फक्त बचत करण्यास सुरुवात करतात. सहा महिन्यानंतर सदर बचत गटातील सदस्यांना एकमेकांविषयी काही अडचण नाही ना?, सर्व सदस्यांकडून बचत गटाचे नियम पाळले जातात का?, नियमित बचत गोळा होत आहे का? इत्यादी बाबी पडताळून पाहिल्या जातात आणि सर्व गोष्टी ठीक असतील तरच बँकेत खाते उघडले जाते व बचत गटाच्या स्थापनेला अधिकृत स्वरूप दिले जाते.

**महिला बचत गटाची कार्ये:**

महिला बचत गटामार्फत केली जाणारी विविध स्वरुपाची कार्ये पुढील प्रमाणे आहेत. बचत गोळा करणे : महिला बचत गटांतर्गत अनेक महिला एकत्र येतात व आपली बचत रक्कम गोळा करतात. आपल्या उत्पन्नातील काही रक्कम बचत करून ती बचत गटात जमा केली जाते. हि बचतीची रक्कम जमा करणे सर्व सदस्यांना शक्य होईल इतकी असते. बचत जमा करण्याचा कालावधी देखील सर्वानुमते ठरविला जातो. साधारणपणे आठवड्याला किंवा महिन्याला बचत गोळा केली जाते व बँकेत बचत गटाच्या खात्यात जमा केली जाते.

**सदस्यांना विनाकारण कर्ज देणे :** महिला बचत गटामार्फत सदस्य महिलांना विनातारण कर्ज देण्यात येते. सर्वसाधारणपणे बचत गटात सहभागी झालेल्या महिला गरीब व कष्टकरी घरातील असतात. सदर महिलांना आपल्या घरगुती व व्यावसायिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून आर्थिक सहाय्याची आवश्यकता असते परंतु तारणा आभारी कोणतीही बँक त्यांना कर्जपुरवठा करण्यास तयार होत नाहीत. अशावेळी महिला बचत गट त्यांच्या मदतीला येतो. महिला बचत गटामार्फत बचत गटातील सदस्य महिलेला अल्प व्याजदराने विनातारण कर्ज पुरवठा केला जातो. तसेच ते कर्ज फेडण्यासाठी विशिष्ट रकमेचा हप्ता देखील ठरवून देण्यात येतो.

**सामायिक समस्यांचे निराकरण करणे :** महिला बचत गटाअंतर्गत समान आर्थिक व सामाजिक स्थितीतील महिला एकत्र येऊन बचत गट स्थापन करतात. त्यामुळे या महिलांचे अनेक प्रश्न समान असतात. या सामाजिक प्रश्नांवर तोडगा शोधण्यासाठी बचत गटातील महिला एकत्र येऊन विचारविनिमय करतात व आपल्या सामायिक समस्यावर उपाय शोधतात.

**बँकेकडून कर्ज घेणे :** बचत गटामार्फत राष्ट्रीयकृत बँकेकडून बचत गटातील महिलांच्या आर्थिक समस्या सोडविण्यासाठी कर्ज घेतले जाते. बँकेकडून घेतलेले कर्ज सदस्य महिलांना देऊन त्यांना आर्थिक पाठबळ दिले जाते. बचत गटामार्फत अनेक वेळा वेगवेगळे व्यवसाय चालवले जातात. सदर व्यवसायाकरिता अशा प्रकारचे कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

**सदस्यांना रोजगाराचे साधन निर्माण करून देणे :** महिला बचत गटाच्या माध्यमातून अनेक गरीब कष्टकरी शेतकरी महिला एकत्र येऊन गट स्थापन करतात. सध्या करीत असलेल्या शेतीमधून किंवा व्यवसायातून महिलांना पुरेसे उत्पन्न मिळत नसते त्यामुळे त्यांची आर्थिक विवंचना होत असते. सदर आर्थिक सदर आर्थिक विवंचनेत या महिलांना बाहेर काढण्यासाठी बचत गटामार्फत विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. जसे की शिवणकाम भाजीपाला विक्री, रेपैरिंग इत्यादी व्यवसाय बचत गटातील सदस्यांमार्फत केले जातात.

**सामुदायिक हमी देणे :** बचत गटातील सदस्यांना व्यवसाय करण्यासाठी कर्जाऊ भांडवलाची आवश्यकता असते. अशावेळी अशा महिलांना बँकेने कर्ज उपलब्ध करून द्यावे म्हणून बचत गट अशा कर्जाला बचत गटाची सामुदायिक हमी देतात. त्यामुळे अशा महिलांना बँकेमार्फत कर्ज उपलब्ध होणे सोपे जाते.

**महिला बचत गटाचे फायदे:**

महिला बचत गटाचे फायदे पुढील प्रमाणे आहेत.

**सामाजिक एकता :** महिला बचत गटाच्या माध्यमातून समाजामध्ये महिलांचे आढळ स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातात. पुरुषप्रधान समाजामध्ये महिलांना पुरूषाच्या खांद्याला खांदा देऊन उभे राहण्यासाठी बचत गटाची भक्कम साथ लागते. महिलांना स्वतःच्या पायावर उभे करून आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता बचत गटाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

**लैंगिक समानता :** पुरुषप्रधान समाजामध्ये प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरुषी वर्चस्व असलेले दिसते. या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांना निम्न स्वरूपाचे स्थान असते. महिलेने चूल आणि मूल इथ पर्यंतच मर्यादित काम करावे अशी रचना पुरुष प्रधान समाजामध्ये असलेली दिसून येते. या सामाजिक बंधनांना झुगारून महिलांनादेखील विकासाची, उन्नतीची संधी मिळाली पाहिजे. अशी संधी बचत गटाच्यामार्फत महिला सदस्यांना उपलब्ध करून देण्यात येते. त्यामुळे समाजामध्ये लैंगिक समानतेचा संदेश रुजण्यास मदत होते.

**दबाव गट :** महिला बचत गटाच्या मार्फत ज्यापद्धतीने आर्थिक बाबींशी संबंधित समस्यांवर उपाय योजना केल्या जातात त्याच पद्धतीने सामाजिक प्रश्नांवर देखील बचत गटामार्फत आवाज उठवला जातो. समाजामध्ये अनेक प्रकारच्या समस्या किंवा प्रश्न अस्तित्वात असतात. उदा- हुंडा, उघड्यावर शौच, मद्यपान, प्राथमिक आरोग्याचे प्रश्न अशा अनेक प्रश्नांवर या महिला बचत गटामार्फत एकत्र येऊन विचार-विनिमय करून या प्रश्नांच्या निराकरणासाठी गावातील ज्येष्ठ व्यक्तींवर किंवा अधिकाऱ्यांवर दबाव निर्माण करतात व गावातील वरील प्रश्नांच्या संदर्भात विचार करण्यास प्रवृत्त करतात.

**रोजगाराचा पर्यायी मार्ग :** बचत गटाच्या माध्यमातून सदस्य महिलांना रोजगाराचा पर्याय मार्ग उपलब्ध करून दिला जातो. बचत गटातील सदस्य महिला या गरीब कष्टकरी घरातून आलेले असतात. त्यामुळे त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण होण्यास अडचणी येतात. परंतु बचत गटामार्फत वेगवेगळे व्यवसाय केले जातात, प्रशिक्षण दिले जाते. या माध्यमातून नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात व या महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

**उपरोक्त वृत्तीत बदल :** बचत गटाच्या माध्यमातून एकत्र आलेल्या महिला वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांवर

विचारविनिमय करत असतात. त्याचबरोबर त्यांना त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी, नेतृत्व गुण वाढविण्यासाठी, व्यावसायिक कौशल्य वाढविण्यासाठी अनेक प्रकारची प्रशिक्षणे घेतली जातात. त्यातून महिलांमध्ये वैचारिक बदल घडून येतात. त्यामुळे अशा महिला जंगल वादावर होणाऱ्या खर्चापेक्षा सुदृढ आरोग्यावर, मुलांच्या शिक्षणावर जास्त भर देतात.

**राहणीमान व आरोग्यावर चांगला परिणाम :** महिला बचत गटाच्या माध्यमातून अनेक रोजगाराभिमुख उपक्रम राबविले जात असतात. त्यातून सदस्य महिलांचे उत्पन्न वाढते. त्यामुळे अशा महिलांच्या राहणीमानात मध्ये वाढ झालेली दिसून येते. तसेच अल्प उत्पन्न यामुळे निर्माण होणारे कुपोषण दूर होते हा ने त्यांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे आरोग्य सुधारते.

**बँक साक्षरता :** बचत गटामुळे सदस्य महिलांमध्ये बँक साक्षरता निर्माण होते. म्हणजेच बँकेमार्फत करण्यात येणाऱ्या व्यवहारांबाबत त्यांना ज्ञान प्राप्त होते. ठराविक कालावधीत बचत गोळा करणे, ती बँकेत जमा करणे, आवश्यकतेनुसार बँकेचे कर्ज उपलब्ध करून घेणे, कर्जाचे सदस्यांमध्ये वाटप करणे अशा विविध कामांमुळे महिलांना बँकांच्या व्यवहाराची ओळख होते.

**निष्कर्ष :**

वरील विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की महिला बचत गट ही संकल्पना समाजातील गरीब कष्टकरी महिलांच्या विकासासाठी उन्नतीसाठी एक महत्त्वाची संकल्पना आहे. महिला बचत गट या संकल्पनेच्या साथीने अनेक आर्थिक व सामाजिक समस्यांवर उपाय योजना केल्या जाऊ शकतात. गरीब होतकरू महिलांना आर्थिक पाठबळ निर्माण करून देऊन त्यांना स्वतःचे रोजगार निर्माण करून आर्थिक दृष्ट्या सबल बनवता येऊ शकते. शासनाच्या विविध योजनांचा लाभ देखील दारिद्र्यरेषेखालील महिलांच्या बचत गटामार्फत घेतला जाऊ शकतो व अशा महिलांच्या जीवनात आर्थिक सुबत्ता आणता येऊ शकते.

**ग्रंथ सूची :**

1. महिला विकासात स्वयंसहाय्यता बचत गटांचे योगदान, लेखिका- डॉ. सुनिता बळीराम माळी, क्रिएटीव्ह पब्लीकेषण, नांदेड, ऑगस्ट २०२०.
2. महिला बचतगट- स्वयंसहाय्यता बचतगट मार्गदर्शिका, लेखक- रवींद्र म. काटोले, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे, सप्टेंबर २०१९
3. महिला स्वयंसहायता बचत गट, प्रा. डॉ. एम. यू. मुलाणी, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
4. बचत गटांसाठी स्वयंरोजगाराचे ५१ महामार्ग, लेखक – एस. बी. पवार, शुभारंभ व्यवसाय मार्गदर्शन प्रकाशन, पुणे., फेब्रु., २०१०
5. महिला सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका : एक समाजशास्त्रीय अभ्यास- विशेष संदर्भ लातूर जिल्हा, सोमवंशी अल्का बाबाराव, फेब्रुवारी- २०१८.
6. Self-Help Group and Women Empowerment in India, Author- Mr. Arjun Yallappa Pangannavar, New Century Publications, Nov., 2012
7. Women Empowerment through Self-Help Group, Author- Mr. Mukesh Upadhyay, Pratiksha Publications, 1 Jan., 2012
8. https://www.iasexpress.net/self-help-groups-shgs/
9. https://testbook.com/ias-preparation/self-help-group/
10. https://en.wikipedia.org/wiki/Self-help_group_(finance)

# गडचिरोली जिल्ह्यातील शैक्षणिक समस्या आणि समाधान

**अजय व्ही.निंबाळकर**
फुले—आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली.
Email: ajaynimbalkar10@gmail.com

**सारांश —** प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये गडचिरोली जिल्ह्यातील शैक्षणिक समस्येवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. गडचिरोली जिल्हा अति मागासलेला, नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. इतर समस्या बरोबरच शैक्षणिक समस्या गडचिरोली मधील प्रमुख समस्या आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये कोणकोणत्या शैक्षणिक समस्या आहेत? त्याचे कारण कोणते आहेत? शहरी भागातील आणि दुर्गम भागातील शैक्षणिक स्थितीमध्ये काही फरक आहे काय? ऑनलाइन शैक्षणिक परिस्थिती कशी आहे? मुलांमधील आणि मुलींमधील शैक्षणिक परिस्थितीमध्ये काही फरक आढळून येतो का? याबाबत प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये प्रकाश टाकण्यात आलेला आहे. या करिता गडचिरोली शहरातील तसेच दुर्गम भागातील भामरागड, कोरची तालुक्यातील काही निवडक शाळांमधील ५० विद्यार्थी नमुना म्हणून घेण्यात आले. तसेच अनुसूचीचा वापर करून सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये नमुना निवड पद्धतीमध्ये कोटा आणि लॉटरी पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. संशोधनातील निष्कर्ष असा निघतो की गडचिरोली जिल्ह्यामध्ये शहरी भागाच्या तुलनेमध्ये दुर्गम भागांमध्ये मुख्यत: ऑनलाइन शिक्षणाबाबत समस्या आढळून येते. त्याचप्रमाणे मराठी आणि इंग्रजी भाषा संदर्भात सुद्धा विद्यार्थ्यांमध्ये समस्या आढळून येते. दुर्गम भागातील मुलांमध्ये आणि मुलींमध्ये शिक्षणाबाबत लक्षणीय फरक आढळून आला.
**कीवर्ड —** नक्षलवाद, शैक्षणिक समस्या, दुर्गम भाग, ऑनलाइन शिक्षण.

**प्रस्तावना —**
गडचिरोली जिल्ह्यामध्ये ८२९ खेड्यांमध्ये इंटरनेट नाही. Department of Telicammunication (DOT) (Times of India 20 January 2022) गडचिरोली जिल्ह्यामधील शाळांमधील दहा विद्यार्थ्यांनी ऑनलाइन शिक्षणाबाबत उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल केली होती. त्यामध्ये वरील माहिती DOT (Department of Telicammunication) यांनी सादर केली. यावरून गडचिरोली मधील शैक्षणिक स्थिती कशी आहे याचा अंदाज येईल.
गडचिरोली जिल्ह्यामध्ये मुख्यत: पुढील प्रकारच्या शाळा आहेत. सरकारी शाळा (जिल्हा परिषदेद्वारे अनुदानित आणि व्यवस्थापित), आश्रम शाळा (आदिवासी विभागाद्वारे व्यवस्थापित केलेल्या निवासी शाळा), खाजगी शाळा (खाजगी संस्था सोसायटीद्वारे अनुदानीत आणि व्यवस्थापित), अंशत: अनुदानित शाळा (सरकारद्वारे वित्तपुरवठा केला जातो आणि खाजगी एजन्सी सोसायटींद्वारे व्यवस्थापित केली जाते), पूर्ण अनुदानित शाळा (सरकारद्वारे अनुदानीत आणि खाजगी संस्था सोसायटींद्वारे व्यवस्थापित), नवोदय शाळा (भारत सरकारद्वारे अनुदानीत (मानव संसाधन विकास मंत्रालय आणि नवोदय सोसायटीद्वारे व्यवस्थापित असल्यास) अशा एकंदरीत सर्व श्रेणीतील शाळा आहेत.
काही वर्षापूर्वी गडचिरोलीतील तीन मुलींनी लाहिरी आश्रमशाळेतून शिक्षकांकडून छेडछाड केल्याचा आरोप करत नक्षलवाद्यांमध्ये जाण्यासाठी पलायन केले होते. त्यांच्या पत्रात अल्पवयीन मुलांनी इतरांनीही शाळा सोडून 'लाल आंदोलनात' (Red movement) सामील होण्याचे आवाहन केले होते. नक्षलवाद्यांच्या हातून दुखापत होऊन त्यातील एकजण नंतर परतला असला, तरी त्यांनी प्रथमत: पळून जाणे हे धक्कादायक होते. (TIMES OF INDIA 22 MAY 2016) अशी विदारक शैक्षणिक परिस्थिती गडचिरोली जिल्ह्यातील आहे.
गडचिरोली जिल्हा महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये अति मागासलेला, नक्षलग्रस्त, अतिदुर्गम जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यांमध्ये आरोग्यविषयक, आर्थिक समस्या बरोबरच शैक्षणिक समस्या गंभीर स्वरूपाचे आहे. शाळा सोडणे, निरक्षरता आणि शैक्षणिक विकासाचा अभाव ही गडचिरोली जिल्ह्यातील एक सामान्य घटना आहे.
गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागामध्ये जसे की, भामरागड, कोरची, बिनागुंडा अशा दुर्गम भागांमध्ये महाविद्यालय शिक्षण तर नाहीच परंतु प्राथमिक शिक्षणाची अवस्था फार वाईट आहे. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत बाराही तालुक्यात जवळपास १५५० प्राथमिक शाळा आहेत. त्या शाळांमध्ये जवळपास पाच हजार शिक्षक आहेत. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद मध्ये शिक्षण विभाग असून या

विभागामार्फत तालुक्यावर नियंत्रण ठेवले जाते. मात्र ग्रामीण, दुर्गम ,अतिदुर्गम भागातील शाळा तेथील मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी गुणवत्ता यासह विविध शैक्षणिक बाबींवर तालुक्याची पर्यवेक्षकीय यंत्रणा नियंत्रण ठेवत असते. सदर पर्यवेक्षकीय यंत्रणेमध्ये गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख आदींचा समावेश आहे. विशेष म्हणजे अहेरी उपविभागात गटशिक्षण अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांची अधिकाधिक पदे रिक्त असल्याने या भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा दर्जा व गुणवत्तेवर परिणाम होत आहे. गडचिरोली, धानोरा, भामरागड या तीन पंचायत समिती स्तरावर नियमित गट शिक्षण अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. इतर नऊ तालुक्यातील गटशिक्षण अधिकाऱ्यांची जबाबदारी प्रभारी अधिकार यांच्या खांद्यावर सोपवण्यात आली आहे. विशेष करून अहेरी उपविभाग व उत्तरि भागातील कोरची, कुरखेडा येथील पंचायत समितीच्या गटशिक्षण अधिकारी पदाचा प्रभार शिक्षण विस्तार अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला आहे. गेल्या दोन—तीन वर्षापासून गटशिक्षण अधिकारी पदाचा हा अनुशेष कायम आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाअंतर्गत बारा तालुके मिळून शिक्षण विस्तार अधिकारी यांची एकूण ३१ पदे मंजूर करण्यात आलेली आहे. या पैकी १८ पदे भरण्यात आलेलि असून १३ पदे रिक्त आहेत. केंद्रप्रमुख यांची पदे रिक्त असल्याने या पदाचा प्रभार ज्येष्ठ शिक्षक तसेच मुख्याध्यापकांकडे सोपविण्यात आलेला आहे. दुर्गम भागातील शाळा रामभरोसे आहे. स्वतंत्र केंद्रप्रमुख नसल्याने दुर्गम भागातील शाळांमधील सुविधा, तेथील गुणवत्ता व विकासाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. पर्यवेक्षीय यंत्रणा या उपविभागात सक्रिय नसल्याने दुर्गम भागातील शाळा रामभरोसे आहेत. परिणामी खैरी उपविभागातील अनेक शाळांचे शिक्षक आठवड्यातून एक ते दोन दिवस शाळेला दांडी मारतात. (लोकमत—२९ एप्रिल २०२१).

**Covid-19 काळातील शैक्षणिक परिस्थिती**

गडचिरोली जिल्ह्यामध्ये आधीपासूनच शैक्षणिक समस्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यातल्या त्यात बवअपक—१९ काळामध्ये ही समस्या आणखी गंभीर झाली. ब्वअपक—१९ काळामध्ये सर्व शिक्षण ऑनलाइन करण्यात आले. याकरीता मोबाईल, इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आला. या सर्व सोयी सुविधा शहरी भागांमध्ये उपलब्ध असल्यामुळे शैक्षणिक अभ्यासक्रमावर फारसा परिणाम झाला नाही. परंतु गडचिरोली जिल्ह्यामधील दुर्गम भागांमध्ये ऑनलाइन शिक्षणामध्ये फार समस्या जाणवल्या.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये शैक्षणिक मागासलेपणाचे मुख्यतः पुढील कारणे आहेत

१) आदिवासीबहुल जिल्हा.

२) नक्षलग्रस्त परिस्थिती.

३) पक्क्या रस्त्यांचा अभाव.

४) दळणवळणाच्या साधनांचा अभाव.

५) चांगल्या शिक्षकांचा अभाव.

शिक्षकांच्या, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा.

**अध्ययनपद्धती —**

**उद्देश—**

प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये पुढील उद्देश आहेत

१) गडचिरोली जिल्ह्यातील शहरांमधील आणि दुर्गम भागातील शैक्षणिक परिस्थितीचे तुलनात्मक अध्ययन करणे.

२) गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागातील ऑनलाइन शैक्षणिक परिस्थिती चे अध्ययन करणे.

३)गडचिरोली जिल्ह्यातील मुले आणि मुलींमधील शैक्षणिक स्थितीचा तुलनात्मक अध्ययन करणे.

**गृहीतकृत्ये—**

१) गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागातील शैक्षणिक स्थिती शहरी भागातील शैक्षणिक स्थिती पेक्षा वाईट आहे.

२) दुर्गम भागातील मुलींची शैक्षणिक स्थिती मुलांपेक्षा निम्न दर्जाची आहे.

३) गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागातील ऑनलाईन शैक्षणिक स्थिती वाईट आहे.

**अध्ययनाचे क्षेत्र —**

प्रस्तुत अध्ययनामध्ये गडचिरोली शहरातील काही निवडक शाळा आणि भामरागड, कोरची तालुक्यामधील काही निवडक शाळा हे अध्ययनाचे क्षेत्र म्हणून निवडण्यात आले.

**अध्ययनाचे विश्व —**

प्रस्तुत संशोधनामध्ये गडचिरोली शहरातील काही निवडक शाळांमधील ४१३ विद्यार्थी आणि भामरागड कोरची येथील २१९ विद्यार्थी असे एकुण ६३२ उत्तरदाते हे अध्ययनाचे विश्व होते.

**नमुना —**

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना म्हणून ५० उत्तरदाते निवडण्यात आले.




**नमुना निवड पद्धती —**

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना निवड पद्धती मध्ये कोटा पद्धत आणि लॉटरी पद्धत चा वापर करण्यात आला.

**परिणाम —**

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करून ५० उत्तरात्यांचे शिक्षणाविषयी , शैक्षणिक समस्याविषयी मत जाणून घेण्यात आले.

त्यामधील प्रमुख परिणाम पुढील प्रमाणे आहेत.

१) शहरी भागातील ८० टक्के विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणामध्ये समस्या नाही.

२) दुर्गम भागातील ८६ टक्के विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये अनेक अडचणींना समोर जावे लागते असे आढळून आले.

३) दुर्गम भागातील ३३ टक्के विद्यार्थ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल नाही असे आढळून आले.

४) दुर्गम भागामध्ये ९६ टक्के विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणामध्ये समस्या आढळून आली. मोबाईल नव्हते, नेटवर्कची समस्या होती असे मत विद्यार्थ्यांनी दर्शवले.

५) ८७ टक्के विद्यार्थ्यांनीत्यांना ऑनलाईन पेपर च्या वेळेस गावापासून दूर, ज्या ठिकाणी इंटरनेट नेटवर्क असते तेथे जावे लागले असे मत दर्शविले .यावरून दुर्गम भागामध्ये ऑनलाइन शिक्षणाबाबत प्रमुख समस्या आढळून येते. मुख्यता नेटवर्कची समस्या आहे.

६) दुर्गम भागामध्ये मुलांच्या तुलनेमध्ये मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

७) दुर्गम भागातील ६३ टक्के विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये भाषेची समस्या आढळून आलेली आहे. दुर्गम भागामध्ये मुख्यत: गोंडी, तेलगू भाषा बोलत असल्यामुळे मराठी आणि इंग्रजी भाषा मध्ये विद्यार्थ्यांमध्ये समस्या जाणवते असे आढळून आले आहे.

**निष्कर्ष —**

वरील सामान्य निष्कर्षावरून असे म्हणता येईल की गडचिरोली मधील दुर्गम भागांमध्ये मुख्यत: ऑनलाइन शिक्षणाबाबत समस्या आढळून येते. त्याचप्रमाणे मराठी आणि इंग्रजी भाषा संदर्भात सुद्धा विद्यार्थ्यांमध्ये समस्या आढळून येते. शहरी आणि ग्रामीण भागातील मुलांमध्ये आणि मुलींमध्ये शिक्षणाबाबत लक्षणीय फरक आढळून आला. दुर्गम भागामध्ये मुलींचे शिक्षणाचे प्रमाण मुलांच्या तुलनेमध्ये कमी आढळले.

**उपाययोजना —**

१)गडचिरोली जिल्ह्यातील काही भाग अति दुर्गम असल्यामुळे तिथे शिक्षणाचा प्रसार, प्रचार होणे आवश्यक आहे.

२) चांगल्या कौशल्यपूर्ण, समर्पक शिक्षकांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. अशा शिक्षकांना जास्तीचे वेतन देऊन,वार्षिक इन्क्रिमेंट देऊन त्यांची नियुक्ती करण्यात यावी.

३) शाळेमधील विद्यार्थी संख्या अति कमी असल्यामुळे पटसंख्या ची मर्यादा नसावी. शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुर्नस्थापित करणे.

४) विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वत:च्या मातृभाषेतून उदारणार्थ गोंडी, तेलगू भाषेतून शिकवण्याचा प्रयत्न करावा. याची सुरुवात गडचिरोली मध्ये झालेली आहे. गडचिरोली मध्ये धानोरा तालुक्यात मोहगाव येथे 'पारंपरिक कोया ज्ञानबोध संस्कार गोटुल' ही शाळा गोंडी भाषेमधून शिक्षण देणारी महाराष्ट्रातील पहिली शाळा आहे.

अशा प्रकारच्या शाळा आणखीन निर्माण व्हाव्या.

५) ऑनलाइन शिक्षण चांगले होण्याकरता दुर्गम भागामध्ये नेटवर्क चांगले असणे आवश्यक आहे. त्याकरता मोबाईल कंपन्यांचे टावर उभारणे आवश्यक आहे.

६) आश्रमशाळांचे तालुका मुख्यालयात स्थलांतर करणे. शाळेतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या संबंधित मुख्यालयात राहण्यास भाग पाडणे.

७) थेट नक्षली धोक्यापासून दूर सुरक्षित शैक्षणिक वातावरण प्रदान करणे,

८) तांत्रिक अभ्यासक्रम भर देण्यात यावा.

**संदर्भ ग्रंथ सूची–**

1. मुनघाटे गो. ना., 'माझी काटेमुंढरीची शाळा' साधना प्रकाशन (प्रथम आवृत्ती, मार्च २०११)
2. Tumsare Vanita Prabhakar – Social Interfaces In Education Among Tribal Children In Dhanora Block Of Gadchiroli, Jdtsw Vol-4] Issue 1 No-5 Pp-87 To 113, (January 2017)
3. Bhalerao S.G. (2010), "The teacher's role in education and development of tribal children-case studies of elementary schools of Jawahar Tahsil dist- Thane", Publication [TISS] Bombay&883.
4. The National Policy on Education 1986& Programme of Action 1992 CED code – R N00-33-0)
5. Ganjapure Vaibhav, 'Maharashtra-829 Gadchiroli villages have no Internet, says DoT'- Times of India (20 January 2022.)
6. Ganjapure Vaibhav 'Education a distant dream for Gadchiroli students' Times of India)22 may,2016)
7. लोकमत न्यूज नेटवर्क , 'रिक्त पदाने शिक्षण विभागाची पर्यवेक्षीय यंत्रणा पांगळी 'लोकमत (२९ एप्रिल २०२१)

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email- rbhole1965@gmail.com
Visit-www.jrdrvb.com

**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102